| ब | **उदारीकरणानंतरचा कालखंड:**<br>१. नवीन आर्थिक सुधारणा आणि कृषि: कृषि आणि जागतिक व्यापार संघटना (WTO), अन्नप्रक्रिया, अर्थसहाय्ये कृषि विषयक किमती आणि सार्वजनिक वितरण प्रणाली, कृषि विषयक वृद्धीवरील सार्वजनिक खर्चाचा प्रभाव.<br>२. नवीन आर्थिक धोरण आणि उद्योग: औद्योगिकीकरण, खाजगीकरण, निर्गुंतवणुकांबाबतच्या व्यूहरचना. थेट विदेशी गुंतवणूक आणि बहुराष्ट्रीय महामंडळांची भूमिका.<br>३. नवीन आर्थिक धोरण आणि व्यापार: बौद्धिक संपदा अधिकार: ट्रिप्स (TRIPS), ट्रिम्स (TRIMS), गॅट्स (GATS) आणि नवीन आयात निर्यात धोरणाचे (EXIM) परिणाम.<br>४. नवीन विनिमय दरव्यवस्था: आंशिक व पूर्ण परिवर्तनीयता, भांडवली खात्याची परिवर्तनीयता.<br>५. नवीन आर्थिक धोरण आणि सार्वजनिक वित्त: राजकोषीय उत्तरदायीत्व अधिनियम, बारावा वित्त आयोग आणि राजकोषीय संघराज्यवाद आणि राजकोषीय एकत्रीकरण.<br>६. नवीन आर्थिक धोरण आणि मौद्रिक पद्धती नवीन व्यवस्थेअंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँकेची भूमिका.<br>७. नियोजन: केंद्रीय नियोजनापासून सूचक नियोजनापर्यंत, वृद्धीसाठी नियोजन आणि बाजार यातील संबंध, विकेंद्रीकृत नियोजन: संविधानातील ७३ वी व ७४ वी घटना दुरूस्ती.<br>८. नवीन आर्थिक धोरण आणि रोजगार: रोजगार आणि दारिद्र्य, ग्रामीण मजुरी, रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन योजना, नवीन ग्रामीण रोजगार हमी योजना. |



MPSCDaily.com

# (१०) भूगोल (माध्यम – मराठी आणि इंग्रजी)

| | पेपर- एक (विषय सांकेतांक **१०२७**) |
|---|---|
| | **भूगोल विषयाची तत्वे** |
| | **प्राकृतिक भूगोल:** |
| १ | **भूरुपशास्त्र :** भूरुप विकासावर नियंत्रण ठेवणारे घटक ; अंतर्जात आणि बहिर्जात बले ; पृथ्वीच्या कवचाची उत्पत्ति आणि उत्क्रांती; भू-चुंबकत्वाची मूलभूत तत्वे; पृथ्वीच्या अंतरंगातील प्राकृतिक स्थिती; भूअभिनती; भूखंड वहन; समस्थायित्व ; भूपट्ट विवर्तनिकी; पर्वत निर्माणावरील अलीकडची मते; ज्वालामुखी क्रिया, भूकंप आणि त्सुनामी; भूरुपिक चक्र आणि भुदृश्य विकासाची संकल्पना ; अनाच्छादन कालानुक्रम; प्रवाह (चॅनल) रुपिकी; अपक्षरण पृष्ठभाग ; उतार विकास; उपयोजित भूरुपशास्त्र; भूरुपशास्त्र ; आर्थिक भूशास्त्र आणि पर्यावरण. |
| २ | **हवामानशास्त्र:** तापमान आणि जागतिक दाब पट्टे ; पृथ्वीचा औष्णिक ताळेबंद; वातावरणीय अभिसरण; वातावरणीय स्थिरता आणि अस्थिरता . ग्रहीय आणि स्थानिक वारे ; मान्सून आणि जेट प्रवाह ; वायूराशी आणि आघाडी / सीमा (from-to) समशीतोष्ण आणि उष्णकटिबंधीय चक्रीवादळे; वृष्टीचे प्रकार आणि वितरण ; हवा आणि हवामान ; कोपेन, थार्नथ्वेट आणि त्रिवार्था यांचे जागतिक हवामानविषयक वर्गीकरण; जलचक्र; जागतिक हवामानातील बदल आणि हवामानातील बदला संबंधात मानवाची भूमिका आणि प्रतिसाद; उपयोजित हवामानशास्त्र आणि नागरी हवामान. |
| ३ | **सागरविज्ञान:** अटलांटिक, हिंदी आणि पॅसिफिक महासागरांची तळरचना; महासागरांचे तापमान आणि क्षारता; उष्णता आणि क्षार ताळेबंद (budgets) सागरीय निक्षेप; लाटा, प्रवाह आणि भरती-ओहोटी; सागरी साधनसंपत्ती ; जैव, खनिज आणि उर्जा साधनसंपत्ती ; प्रवाळ , प्रवाळ विरंजन; सागर – पातळीतील बदल ;सागरी कायदे आणि सागरी प्रदूषण |
| ४ | **जीवभूगोलशास्त्र:** मृदांची उत्पत्ती ; मृदांचे वर्गीकरण आणि वितरण; मृदाछेद , मृदेची धूप, ऱ्हास व संधारण वनस्पती आणि प्राण्यांच्या जागतिक वितरणावर परिणाम करणारे घटक ;निर्वणीकरण समस्या आणि संधारणाचे उपाय; सामाजिक वनीकरण; कृषि वनीकरण; वन्य जीवन; प्रमुख जीन संचय केंद्रे. |
| ५ | **पर्यावरण भूगोल:** परिस्थितिकी तत्वे; मानवी पारिस्थितिकीय अनुकूलन; पारिस्थितिकी आणि पर्यावरणावर मानवाचा प्रभाव; वैश्विक आणि प्रादेशिक पारिस्थितिकीतील बदल आणि असंतुलन; परिसंस्था त्याचे व्यवस्थापन आणि संवर्धन; पर्यावरणीय ऱ्हास, व्यवस्थापन आणि संवर्धन; जैव विविधता आणि शाश्वत विकास, पर्यावरणीय धोरण, पर्यावरणीय धोके आणि सुधारात्मक उपाययोजना; पर्यावरणीय शिक्षण आणि कायदे. |
| | **मानवी भूगोल** |
| १ | **मानवी भूगोलातीत परिप्रेक्ष्य:** क्षेत्रीय विभिन्नता; प्रादेशिक संश्लेषण; द्विभाजन आणि व्दैतवाद, पर्यावरणवाद; सांख्यिकी क्रांती आणि स्थानीय विश्लेषण; मूलगामी, वर्तनाधिष्ठित मानवी आणि कल्याणकारी दृष्टीकोन; भाषा, धर्म आणि धर्मनिरपेक्षता; जागतिक सांस्कृतिक प्रदेश, मानव विकास निर्देशांक. |
| २ | **आर्थिक भूगोल :** जागतिक आर्थिक विकास ; मापन आणि समस्या; जागतिक साधनसंपत्ती आणि तिचे वितरण; ऊर्जा संकट; वृद्धी मर्यादा: जागतिक कृषि, कृषि प्रदेशांचे प्रकारनिष्ठ वर्गीकरण, कृषि निविष्ठा आणि उत्पादकता; अन्न व पोषण समस्या, अन्न सुरक्षा; दुष्काळ: कारणे, परिणाम आणि उपाययोजना; जागतिक उद्योग; स्थानीय प्रारुप आणि समस्या; जागतिक व्यापाराचा आकृतिबंध . |
| ३ | **लोकसंख्या आणि वसाहत भूगोल :** जागतिक लोकसंख्या वाढ आणि वितरण, लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये ; स्थलांतराची कारणे आणि परिणाम; अतिरिक्त- न्यूनत्तम- आणि पर्याप्त लोकसंख्या संकल्पना, लोकसंख्या सिद्धांत, जागतिक लोकसंख्येच्या समस्या आणि धोरणे; सामाजिक स्वास्थ्य आणि जीवनमानाची दर्जा; लोकसंख्या- एक सामाजिक भांडवल, ग्रामीण वसाहतींचे प्रकार आणि आकृतिबंध; ग्रामीण वसाहतीमधील पर्यावरणीय समस्या; नागरी वसाहतींचा श्रेणीक्रम; नागरी भूरुपवर्णन; अग्रेसर शहरांची |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| | संकल्पना आणि श्रेणी - आकार नियम; नगरांचे कार्यात्मक वर्गीकरण; नागरी प्रभाव क्षेत्र, ग्रामीण - नागरी पट्टे, उपग्रह नगरे, नागरीकरणाच्या समस्या आणि उपाय योजना; शहरांचा शाश्वत विकास. |
| ४ | **प्रादेशिक नियोजन :** प्रदेशाची संकल्पना, प्रदेशांचे प्रकार आणि प्रादेशिकीकरणाच्या पद्धती; वृद्धि केंद्रे आणि वर्धन केंद्रे; प्रादेशिक असमतोल; प्रादेशिक विकासाची व्यूहरचना; प्रादेशिक नियोजनामधील पर्यावरणीय समस्या; शाश्वत विकासासाठी नियोजन. |
| ५ | **मानवी भूगोलातील प्रतिमाने, सिद्धांत आणि कायदे :** मानवी भूगोलातील संस्थात्मक विश्लेषण, माल्थस, मार्क्स आणि लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण प्रतिमाने; ख्रिस्टॅलर व लॉश यांचे केंद्रस्थान सिद्धांत; पेरॉक्स आणि बॉडविले यांचे सिध्दांत. वॉन थुनेनचे कृषि स्थान प्रतिमान; वेबरचे औद्योगिक स्थान प्रतिमान, ओस्टोव्हचे वृध्दी टप्प्यांचे प्रतिमान, मर्मभूमी (हार्टलॅन्ड) व परिधीभूमी (रिमलॅन्ड) सिद्धांत; आंतरराष्ट्रीय सीमा आणि सीमा प्रदेशासंबंधातील कायदे. |

| पेपर-दोन ( विषय सांकेतांक १०२८) | |
|---|---|
| **भारताचा भूगोल** | |
| १. | प्राकृतिक रचना: भारताचे शेजारील देशांशी स्थलीय संबंध; संरचना आणि उठाव (relief); जलनिस्सार प्रणाली आणि पाणलोट क्षेत्र; प्राकृतिक प्रदेश; भारतीय मान्सून यंत्रणा आणि पर्जन्यमानाचे स्वरूप; उष्णकटिबंधीय चक्रीवादळे आणि पश्चिम विक्षोभ; पूर आणि अवर्षण; हवामान प्रदेश, नैसर्गिक वनस्पती; मृदाचे प्रकार आणि तिचे वितरण. |
| २. | साधन संपत्ती: जमीन, पृष्ठभाग आणि भूजल, ऊर्जा, खनिजे, जैविक आणि सागरी साधनसंपत्ति, वन व वन्यजीव साधन संपत्ती आणि त्यांचे संवर्धन, ऊर्जा संकटे. |
| ३. | **कृषि:** पायाभूत सुविधा; जलसिंचन, बी-बियाणे, खते, वीज, संस्थात्मक घटक; जमीन धारणा, भू-पट्टेदारी आणि जमीन - सुधारणा; पीक पध्दती, कृषि उत्पादकता, कृषि तीव्रता, पीक संयोजन, जमीन क्षमता; कृषि सामाजिक वनीकरण; हरित क्रांती आणि तिचे सामाजिक – आर्थिक पर्यावरणीय परिणाम; कोरडवाहू शेतीचे महत्व; पशुधन साधनसंपत्ती आणि श्वेत क्रांती; जलीय संवर्धन, रेशीम उत्पादन, कृषि आणि कुक्कुटपालन; कृषि प्रादेशिकीकरण; कृषि-हवामान क्षेत्रे; कृषि पारिस्थितिकीय प्रदेश. |
| ४. | **उद्योग :** औद्योगिक क्रांती; कापूस, ताग, वस्त्रनिर्माण, लोह आणि पोलाद, ॲल्युमिनियम, खते, कागद, रसायने आणि औषधनिर्माण, स्वयंचलित (automobile), कुटीरोद्योग आणि कृषि-आधारित उद्योग यांचे स्थान निश्चितीचे घटक; सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांसह उद्योग गृहे आणि संकुले; औद्योगिक प्रादेशिकीकरण; नवीन औद्योगिक निगम धोरण; बहुराष्ट्रीय निगम आणि उदारीकरण; विशेष आर्थिक क्षेत्रे; पर्यावरण स्नेही पर्यटन. |
| ५. | **वाहतूक, दळणवळण आणि व्यापार :** रस्ते, रेल्वे, जलमार्ग, हवाईमार्ग आणि नलिकामार्गांचे जाळे आणि प्रादेशिक विकासामधील त्यांची पूरक भूमिका ; राष्ट्रीय आणि परराष्ट्रीय व्यापाराबाबत बंदरांचे वाढते महत्व, व्यापारशेष; व्यापार धोरण; निर्यात प्रक्रिया क्षेत्रे, दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञानामधील विकास आणि अर्थव्यवस्था आणि समाजावर होणारे त्याचे परिणाम; भारतीय अंतराळ कार्यक्रम. |
| ६. | **सांस्कृतिक जडणघडण (setting) :** भारतीय समाजाचे ऐतिहासिक पैलू ; वांशिक, भाषिक आणि मानववंशीय; विभिन्नता; धार्मिक अल्पसंख्याक; प्रमुख जमाती, जमातींची क्षेत्रे आणि त्यांच्या समस्या; सांस्कृतिक प्रदेश; लोकसंख्येची वाढ, वितरण आणि घनता; लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये: लिंग-गुणोत्तर, वय संरचना, साक्षरता दर, श्रमिक पथक; अवलंबता गुणोत्तर, आयुर्मान, स्थलांतर (आंतर प्रादेशिक, प्रदेशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय) आणि त्यासंबंधीत समस्या; लोकसंख्येच्या समस्या आणि धोरणे, आरोग्य निर्देशांक. |
| ७. | **वसाहती:** ग्रामीण वसाहतींचे प्रकार, आकृतिबंध आणि भूरूपवर्णन; नगर विकास; भारतीय शहरांचे भूरूपवर्णन; भारतीय शहरांचे कार्यात्मक वर्गीकरण; बृहन्महानगरी प्रदेश आणि महानगरी प्रदेश; नागरी प्रसरण; झोपडपट्टी आणि त्यासंबंधित समस्या; नगर नियोजन; नागरीकरणाच्या समस्या आणि उपाययोजना. |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| ८. | प्रादेशिक विकास आणि नियोजन; भारतातील प्रादेशिक नियोजनाचा अनुभव; पंचवार्षिक योजना ; एकात्मिकृत ग्रामीण विकास कार्यक्रम; पंचायती राज आणि विकेंद्रित नियोजन; लाभक्षेत्र विकास ; पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, मागास क्षेत्र, वाळवंट, अवर्षणप्रवण, डोंगरी आदिवासी क्षेत्र विकासासाठी नियोजन; बहु-स्तरीय नियोजन; बेट भूप्रदेशांचे प्रादेशिक नियोजन आणि विकास. |
| ९. | **राजकीय पैलू :** भारतीय संघराज्यवादाचा भौगोलिक आधार; राज्य पुनर्रचना; नवीन राज्यांचा उदय; प्रादेशिक जाणीव आणि आंतर-राज्यीय समस्या ; भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमा आणि त्यासंबंधातील समस्या ; सीमेपलीकडील दहशतवाद; जागतिक कारभारामधील भारताची भूमिका, दक्षिण आशिया आणि भारतीय महासागर भूराजनीती. |
| १०. | **समकालीन समस्या :** पारिस्थितिकीय समस्या; पर्यावरणीय धोके; भूस्खलन, भूकंप, त्सुनामी, पूर आणि दुष्काळ, महामारी; पर्यावरणीय प्रदुषणाशी संबंधित समस्या, जमीन वापराच्या पद्धतीतील बदल; पर्यावरणीय प्रभाव परिक्षणाची आणि पर्यावरणीय व्यवस्थापनाची तत्वे; जनसंख्या विस्फोट आणि अन्न सुरक्षा; पर्यावरणीय ऱ्हास; निर्वनीकरण, वाळवंटीकरण आणि मृदेची धूप; शेतजमीन विषयक समस्या आणि औद्योगिक अशांतता; आर्थिक विकासामधील प्रादेशिक विषमता; शाश्वत वृध्दी आणि विकासाची संकल्पना; पर्यावरणीय जागरुकता ; नद्यांची जोडणी; जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था.<br>**टीप: उमेदवारांनी या पेपरमध्ये समाविष्ट असलेल्या विषयांशी संबंधित नकाशावरील एका अनिवार्य प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक असेल.** |



MPSCDaily.com

# (१२) इतिहास (माध्यम- मराठी आणि इंग्रजी)

| | पेपर-एक ( विषय सांकेतांक १०३१) |
|---|---|
| १. | **साधने**:<br>**पुरातत्वशास्त्रीय साधने :** अन्वेषण, उत्खनन, पुरालेखविद्या, नाणकशास्त्र, ऐतिहासिक स्मारके;<br>**साहित्यिक साधने :** देशीय, प्राथमिक आणि दुय्यम; काव्य, वैज्ञानिक साहित्य, प्रादेशिक भाषामधील साहित्य, धार्मिक साहित्य, परकीय वृत्तांत ( account) , ग्रीक, चीनी आणि अरब लेखक. |
| २. | प्रागैतिहासिक काळ आणि आद्यैतिहासिक काळ : भौगोलिक घटक; शिकार करणे आणि टोळ्यांनी राहणे (पुराश्मयुग आणि मध्याष्मयुग) शेती करण्यास सुरुवात ( नवाश्मयुग आणि कांस्यपाषाण युग) |
| ३. | सिंधू खोरे संस्कृती : उत्पत्ती, काळ, विस्तार, वैशिष्ट्ये, ऱ्हास, जीवन आणि महत्त्व, कला व वास्तुशास्त्र. |
| ४. | **बृहदाश्मयुगीन संस्कृती:** सिंधूसंस्कृतीखेरीज पशुपालन व कृषि संस्कृतीची विभागणी, सामूहिक जीवनाचा विकास, वसाहती, शेतीचा विकास, हस्तकला, मातीची भांडी आणि लोह उद्योग. |
| ५. | **आर्य व वैदिक कालखंड :**<br>**भारतातील आर्यांचा विस्तार:**<br>वैदिक कालखंड: धार्मिक आणि तात्विक साहित्य; ऋग्वैदिक ते उत्तर वैदिक काळातील बदल, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवन; वैदिक युगाचे महत्त्व; राजेशाही आणि वर्ण व्यवस्थेची उत्क्रांती. |
| ६. | **महाजनपदांचा कालखंड:** राज्यांची निर्मिती (महाजनपद) गणराज्य आणि राजेशाही; नागरी केंद्राचा उदय; व्यापार मार्ग; आर्थिक वृध्दी; नाणेपध्दतीचा प्रारंभ; जैन व बौद्ध धर्माचा प्रसार; मगध व नंद घराण्याचा उदय. इराणी आणि ग्रीक यांची आक्रमणे आणि त्यांचे परिणाम. |
| ७. | **मौर्य साम्राज्य :** मौर्य साम्राज्याचा पाया चंद्रगुप्त, कौटिल्य व अर्थशास्त्र, अशोक, धर्माची संकल्पना, राजाज्ञा ; राज्यव्यवस्था प्रशासन, अर्थव्यवस्था; कला, वास्तुशास्त्र व शिल्पकला; परराष्ट्र संबंध; धर्म; धर्मांचा प्रचार; साहित्य, साम्राज्याचे विघटन; शुंग व कण्व. |
| ८. | **मौर्य-उत्तर कालखंड (इंडो- ग्रीक, शक, कुशाण, पश्चिम क्षत्रप) :** बाह्य जगाशी संपर्क; नागरी केंद्रांची वाढ, अर्थव्यवस्था, नाणेपध्दती धर्मांचा विकास, महायान, सामाजिक परिस्थिती, कला, वास्तुशास्त्र, संस्कृती, साहित्य व विज्ञान. |
| ९. | **पूर्व भारत, दख्खन आणि दक्षिण भारतातील प्रारंभिक राजसत्ता आणि समाज:** खारवेल, सातवाहन, संगम कालखंडातील तामिळ राज्य; प्रशासन, अर्थव्यवस्था, भूमी अनुदान, नाणे पध्दती, व्यापारी संघ व नागरी केंद्रे; बौद्ध केंद्र; संगम साहित्य आणि संस्कृती: कला व वास्तुशास्त्र. |
| १०. | **गुप्त वाकाटक आणि वर्धन :** राज्यव्यवस्था व प्रशासन, आर्थिक स्थिती, गुप्त कालखंडातील नाणे पध्दती, भूमी अनुदान, नागरी केंद्रांचा ऱ्हास, भारतीय सरंजामशाही, जाती व्यवस्था, महिलांची स्थिती, शिक्षण आणि शैक्षणिक संस्था: नालंदा, विक्रमशिला आणि वल्लभी, साहित्य, वैज्ञानिक साहित्य, कला व वास्तुशास्त्र. |
| ११. | **गुप्त कालखंडातील प्रादेशिक राजसत्ता:** कदंब, पल्लव, बदामीचे चालुक्य; राज्यव्यवस्था व प्रशासन, व्यापारी संघ, साहित्य; वैष्णव व शैव धर्मांची वाढ. तमिळ भक्ती चळवळ, शंकराचार्य, वेदांत; मंदिर संस्था व मंदिर वास्तुकला, पाल, सेन, राष्ट्रकुट, परमार: राज्यव्यवस्था व प्रशासन, सांस्कृतिक पैलू, अरबांचा सिंधवरील विजय; अल्बेरुनी, कल्याणी चालुक्य, चोल, होयसूळ, पांड्य: राज्यव्यवस्था आणि प्रशासन; स्थानिक शासन; कला व वास्तुशास्त्राची वाढ, धार्मिक संप्रदाय, मंदिर संस्था व मठ, अग्रहार. शिक्षण व साहित्य अर्थव्यवस्था व समाज. |
| १२. | **प्रारंभिक भारतीय सांस्कृतिक इतिहासातील संकल्पना:** भाषा व संहिता, कला व वास्तुशास्त्राच्या उत्क्रांतीमधील प्रमुख टप्पे, प्रमुख तत्त्ववेत्ते आणि ज्ञानशाखा ,विज्ञान व गणितातील कल्पना. |
| १३. | **प्रारंभिक मध्ययुगीन भारत, इ.स. ७५० - १२०० :**<br>• **राज्यव्यवस्था :** उत्तर भारत आणि द्वीपकल्पामधील प्रमुख राजकीय घडामोडी, राजपुतांचे कूळ (Origin) व उदय.<br>• **चोल:** प्रशासन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि समाज, " भारतीय सरंजामशाही ".<br>• कृषि प्रधान अर्थव्यवस्था आणि नागरी वसाहती.<br>• व्यापार व वाणिज्य<br>• **समाज:** ब्राह्मणांची स्थिती आणि नवीन समाज व्यवस्था.<br>• स्त्रियांची स्थिती.<br>• भारतीय विज्ञान व तंत्रज्ञान. |


MPSCDaily.com

| | |
|---|---|
| १४. | **भारतातील सांस्कृतिक परंपरा, इ.स. ७५०-१२०० :**<br>• तत्त्वज्ञान: शंकराचार्य आणि वेदांत, रामानुज व विशिष्ट द्वैत, मध्व आणि ब्राह्म - मीमांसा.<br>• धर्म: धर्माचे स्वरूप व वैशिष्ट्ये, तमिळ भक्ती पंथ, भक्ती पंथाची वाढ, इस्लाम आणि त्याचे भारतातील आगमन, सुफीवाद.<br>• साहित्य : संस्कृतमधील साहित्य, तमिळ साहित्याची वाढ, नव्याने विकसित होत असलेल्या भाषांतील साहित्य, कल्हनची राजतरंगिणी, अल्बेरुनीचा भारत.<br>• कला व वास्तुशास्त्र : मंदिर वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला. |
| १५. | **तेरावे शतक :**<br>• दिल्ली सुलतानशाहीची स्थापना: म. घोरीची आक्रमणे – म. घोरीच्या यशामागील घटक.<br>• आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम.<br>• दिल्लीच्या सुलतानशाहीची स्थापना आणि प्रारंभिक तुर्की सुलतान<br>• दृढीकरण : इल्तुतमिश आणि बलबन यांची राजवट. |
| १६. | **चौदावे शतक :**<br>• "खिल्जी क्रांती"<br>• अल्लाउद्दीन खिल्जी:जिंकलेले प्रदेश आणि प्रादेशिक विस्तार, कृषि विषयक व आर्थिक उपाययोजना.<br>• मुहम्मद तुघलक : प्रमुख प्रकल्प, कृषि विषयक उपाययोजना, मुहम्मद तुघलक कालीन नोकरशाही.<br>• फिरोझ तुघलक : कृषिविषयक उपाययोजना, स्थापत्य अभियांत्रिकी आणि सार्वजनिक बांधकामामधील कामगिरी, सुलतानशाहीचा ऱ्हास, परराष्ट्रीय संबंध आणि इब्न बतूताचे वर्णन. |
| १७. | **चौदाव्या व पंधराव्या शतकातील समाज, संस्कृती आणि अर्थव्यवस्था:**<br>• **समाज :** ग्रामीण समाजाची रचना, सत्ताधिशांचे वर्ग, शहरी रहिवासी, महिला, धर्मांतील वर्ग, सुलतानशाहीमधील जाती आणि गुलामी, भक्ती चळवळ, सुफी चळवळ.<br>• **संस्कृती :** पार्शियन साहित्य, उत्तर साहित्य भारताच्या प्रादेशिक भाषांतील साहित्य, दक्षिण भारताच्या भाषांमधील वाङमय, सुलतानशाहीमधील वास्तुशास्त्र आणि नवीन संरचनात्मक नमुने, संमिश्र संस्कृतीची उत्क्रांती.<br>• **अर्थव्यवस्था :** कृषि उत्पादन, नागरी अर्थव्यवस्थेचा उदय आणि अकृषि उत्पादन, व्यापार व वाणिज्य. |
| १८. | **पंधरावे शतक व सोळाव्या शतकाचा प्रारंभचा - राजकीय विकास आणि अर्थव्यवस्था :**<br>• प्रांतीय राजघराण्यांचा उदय: बंगाल, काश्मीर (झैन-उल-अबेदिन), गुजरात.<br>• माळवा, बहामनी राज्य<br>• विजयनगर साम्राज्य.<br>• लोदी.<br>• मुघल साम्राज्य, प्रारंभिक स्थिती; बाबर, हुमायुन.<br>• सूर साम्राज्य: शेरशाहाचे प्रशासन, पोर्तुगीजांचे वसाहत विषयक उपक्रमः भक्ती व सुफी चळवळी. |
| १९. | **पंधरावे शतक आणि सोळाव्या शतकाचा प्रारंभ - समाज व संस्कृती :**<br>• प्रादेशिक संस्कृतीची वैशिष्ट्ये<br>• साहित्यिक परंपरा<br>• प्रांतिक वास्तुशास्त्र<br>• विजयनगरच्या साम्राज्यातील समाज, संस्कृती, साहित्य आणि कला. |
| २०. | **अकबर :**<br>• जिंकलेले प्रदेश आणि साम्राज्याचे दृढीकरण.<br>• जहागीर व मनसब पध्दतींची सुरुवात<br>• राजपूत विषयक धोरण<br>• धार्मिक व सामाजिक दृष्टीकोनाचा विकास, सुलह-ए-कुल सिद्धांत व धार्मिक धोरण.<br>• कला व तंत्रज्ञानाला राजाश्रय. |
| २१ | **सतराव्या शतकातील मुघल साम्राज्य :**<br>• जहांगीर, शाहजान आणि औरंगजेब यांची प्रमुख प्रशासकीय धोरणे.<br>• साम्राज्य व जमीनदार<br>• जहांगीर, शाहजान आणि औरंगजेब यांची धार्मिक धोरणे. |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| | • मुघल राज्याचे स्वरूप<br>• सतराव्या शतकाच्या उत्तरार्धातील अराजक आणि बंड.<br>• अहोम राज्य<br>• शिवाजी आणि प्रारंभिक मराठा राज्य |
| २२ | **१६ व्या आणि १७ व्या शतकातील अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था:**<br>• लोकसंख्या, कृषि आणि हस्तकला उत्पादन.<br>• शहरे, डच, इंग्रज फ्रेंच कंपन्यांमार्फत युरोपबरोबर व्यापार : एक व्यापार क्रांती<br>• भारतीय व्यापारी वर्ग, बँकिंग, विमा आणि पतपेढ्या.<br>• शेतकऱ्यांची स्थिती, महिलांची स्थिती<br>• शीख समुदाय व खालसा पंथाचा उदय. |
| २३ | **मुघल कालीन संस्कृती:**<br>• पर्शियन इतिहास लेखन आणि इतर साहित्य.<br>• हिंदी व धार्मिक साहित्य.<br>• मुघल वास्तुशास्त्र<br>• मुघल चित्रकला<br>• प्रांतीय वास्तुशास्त्र आणि चित्रकला<br>• शास्त्रीय संगीत<br>• विज्ञान व तंत्रज्ञान |
| २४. | **अठरावे शतक:**<br>• मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाचे घटक<br>• प्रादेशिक राज्ये: निजाम, दख्खन, बंगाल, अवध.<br>• पेशव्यांच्या अधिपत्याखालील मराठ्यांची राज्य.<br>• मराठ्यांची आर्थिक व वित्तीय व्यवस्था<br>• अफगाण सत्तेचा उदय, पानिपतची लढाई **१७६१**.<br>• ब्रिटिशांच्या विजयाच्या पूर्वसंध्येला राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थिती. |

| | पेपर-दोन (विषय **सांकेतांक १०३२**) |
|---|---|
| १. | **भारतामध्ये युरोपीयनांचे आगमन:**<br>प्रारंभिक काळातील युरोपियन वसाहती; पोर्तुगीज आणि डच; इंग्रज व फ्रेंच ईस्ट इंडिया कंपन्या; वर्चस्वासाठी त्यांचे संघर्ष; कर्नाटक युध्दे, बंगाल- इंग्रज आणि बंगालचे नवाब यांच्यातील संघर्ष; सिराज उद्दौल्ला व इंग्रज, प्लासीची लढाई; प्लासीचे महत्त्व. |
| २. | **भारतातील ब्रिटीशांचा विस्तार:**<br>बंगाल-मीर जाफर व मीर कासिम; बक्सारची लढाई, म्हैसूर; मराठा; तीन इंग्रज - मराठा युध्दे; पंजाब. |
| ३. | **ब्रिटीश राजवटीची प्रारंभिक रचना:**<br>प्रारंभिची प्रशासकीय रचना: द्विदल राज्य पध्दतीकडून थेट नियंत्रणाकडे; रेग्यूलेटिंग कायदा (१७७३); द पिट्स ॲक्ट (१७८४), चार्टर ॲक्ट (१८३३); मुक्त व्यापाराचे स्वातंत्र्य (Voice) आणि ब्रिटीशांच्या वसाहत विषयक राजवटीचे बदलते स्वरूप; इंग्रजांचा उपयोगितावाद व भारत. |
| ४. | **ब्रिटीश वसाहतवादी राजवटीचा अर्थव्यवस्थेवर प्रभाव :**<br>ब्रिटीश भारतातील जमीन महसूल पध्दती; कायमधारा पध्दती; रयतवारी पध्दती; महालवारी पध्दती; महसुली व्यवस्थेचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम; कृषीचे व्यापारीकरण; भूमिहीन कृषी मजुरांचा उदय; ग्रामीण समाजाची निर्धनता; पारंपरिक व्यापार व वाणिज्य यामधील अव्यवस्था; अनौद्योगिकरण पारंपरिक हस्तकलांचा ऱ्हास, संपत्तीचे नि:सारण; भारताचे आर्थिक परिवर्तन; तार व टपाल सेवांसह रेल्वे-रस्ते मार्गांचे आणि दळणवळणाचे जाळे: ग्रामीण भागातील दुष्काळ व दारिद्र्य: युरोपीन व्यवसायिक उपक्रम आणि त्यांच्या मर्यादा. |
| ५. | **सामाजिक व सांस्कृतिक विकास :**<br>स्वदेशी शिक्षणाची स्थिती, आणि त्याची अव्यवस्था; पौर्वात्य-इंग्रजी अभ्यासकांमधील वाद; भारतात पाश्चिमात्य शिक्षणाची सुरुवात; मुद्रणकलेचा (प्रेस) उदय; साहित्य व जनमत; आधुनिक देशी भाषांचा उदय; विज्ञानाची प्रगती; भारतातील ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हालचाली . |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| ६. | **<u>बंगाल आणि इतर प्रांतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी:</u>**<br>राजाराम मोहन रॉय, ब्राह्मो समाज चळवळ; देवेंद्रनाथ टागोर; ईश्वरचंद्र विद्यासागर; यंग बंगाल चळवळ; दयानंद सरस्वती; सती, विधवा पुनर्विवाह, बाल विवाह इत्यादीसह भारतातील सामाजिक सुधारणा चळवळी; आधुनिक भारताच्या वृद्धीसाठी भारतीय प्रबोधन युगाचे योगदान, इस्लामिक पुनरुज्जीवन वाद - फेराझी व वहाबी चळवळी. |
| ७. | **<u>ब्रिटिश राजवटीला भारतीयांची प्रतिक्रिया :</u>** रंगपूर धिंग (१७८३), कोल बंड (१८३२) मलबार मधील मोपला बंड (१८४१ - १९२०), संथाळ हुल (१८५५), निळीचे बंड (१८५९-६०) दख्खन उठाव (१८७५) आणि मुंडा उलगुलन (१८९९ - १९००) यांसह १८ व्या व १९ व्या शतकातील शेतकरी चळवळी व आदिवासी उठाव: १८५७ चा उठाव: उगम, स्वरूप, अपयशाची कारणे, परिणाम; १८५७ नंतरच्या कालावधीत शेतकरी उठावांच्या स्वरूपातील बदल; १९२० ते १९३० मधील शेतकरी चळवळी. |
| ८. | **<u>भारतीय राष्ट्रवादाचा उदय होण्यास कारणीभूत ठरलेले प्रमुख घटक :</u>** काँग्रेसपूर्व संघटनांचे राजकारण, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना; काँग्रेसच्या उदयाच्या संबंधातील सुरक्षा-झडपेचा (सेफ्टी वॉल्व) सिद्धांत, काँग्रेसचे कार्यक्रम व उद्दिष्टे; सुरुवातीच्या काळातील कॉंग्रेस नेतृत्वाची सामाजिक जडणघडण ; मवाळवादी आणि जहालवादी, बंगालची फाळणी (१९०५); बंगालमधील स्वदेशी चळवळ; स्वदेशी चळवळीचे आर्थिक आणि राजकीय पैलू; भारतातील क्रांतीकारी जहाल मतवादाची सुरुवात. |
| ९. | महात्मा गांधींचा उदय; गांधीवादी राष्ट्रवादाचे स्वरूप; गांधीजींची लोकप्रिय आवाहने; रौलेट सत्याग्रह ;खिलाफत चळवळ, असहकार चळवळ; असहकार चळवळीच्या अखेरीसपासून सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या प्रारंभापर्यंतचे राष्ट्रीय राजकारण, सविनय कायदेभंग चळवळीचे दोन टप्पे; सायमन आयोग; नेहरू अहवाल ; गोलमेज परिषदा, राष्ट्रवाद आणि शेतकरी चळवळ ; राष्ट्रवाद आणि कामगार वर्गाच्या चळवळी, भारतीय राजकारणातील महिला आणि भारतीय तरुण व विद्यार्थी (१८८५-१९४७); १९३७ ची निवडणूक आणि मंत्रिमंडळांची निर्मिती ; क्रिप्स आयोग ; भारत छोडो चळवळ; वेव्हेल योजना: कॅबिनेट आयोग. |
| १०. | १८५८ ते १९३५ मधील वसाहतिक भारतातील घटनात्मक विकास. |
| ११. | राष्ट्रीय चळवळीतील इतर प्रवाह, क्रांतीकारी चळवळी: बंगाल, पंजाब, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मद्रास प्रांत, भारता बाहेरील क्रांतिकारी चळवळी/ डावी विचारसरणी; काँग्रेसमधील डावी विचारसरणी: जवाहरलाल नेहरू, सुभाष चंद्र बोस, काँग्रेस समाजवादी पक्ष; भारतीय साम्यवादी पक्ष, इतर डावे पक्ष. |
| १२. | अलगाववादी राजकारण: मुस्लिम लिग; हिंदू महासभा; जातीयतावाद आणि फाळणीचे राजकारण, सत्तेचे हस्तांतरण; स्वातंत्र्य. |
| १३. | राष्ट्रबांधणी; पं. नेहरुंचे परराष्ट्र धोरण : भारत आणि त्याचे शेजारी (१९४७-१९६४); राज्यांची भाषावार पुनर्रचना (१९३५ - १९४७); प्रादेशिकतावाद आणि प्रादेशिक असमानता; संस्थानांचे विलीनीकरण; निवडणूक राजकारणामध्ये संस्थानिक; राष्ट्रीय भाषेचा प्रश्न. |
| १४. | १९४७ नंतरची जातीयता आणि वांशिकता; उत्तर-वसाहतवादी निवडणूक राजकारणातील मागास जाती आणि जमाती ; दलित चळवळी. |
| १५. | आर्थिक विकास आणि राजकीय बदल जमीन सुधारणा, नियोजनाचे राजकारण आणि ग्रामीण पुनर्रचना ;<br>उत्तर वसाहतवादी भारतातील परिस्थितिकी आणि पर्यावरण धोरण; विज्ञानाची प्रगती. |
| १६. | **<u>प्रबोधन आणि आधुनिक कल्पना:</u>**<br>(१) प्रबोधनाच्या मुख्य कल्पनाः कांट, रूसो.<br>(२) वसाहतींमधील प्रबोधनाचा प्रसार.<br>(३) समाजवादी विचारसरणीचा उदय (मार्क्सवादापर्यंत ); मार्क्सवादी समाजवादाचा विस्तार प्रसार. |
| १७. | **<u>आधुनिक राजकारणाचा उगम:</u>**<br>(१) युरोपियन राज्यपद्धती<br>(२) अमेरिकन राज्यक्रांती आणि संविधान<br>(३) फ्रेंच राज्यक्रांती आणि नंतरचा काळ, (१७८९- १८१५)<br>(४) अब्राहम लिंकन यांच्या संदर्भात अमेरिकन गृहयुध्द आणि गुलामगिरीचे उच्चाटन<br>ब्रिटिश लोकशाहीवादी राजकारण. १८१५-१८५०: संसदीय सुधारणा, मुक्त व्यापार, धर्मादाय संस्था. |
| १८. | **<u>औद्योगिकीकरण</u>**<br>(१) इंग्लंडची औद्योगिक क्रांती: कारणे आणि तिचा समाजावरील प्रभाव.<br>(२) इतर देशांमधील औद्योगिकीकरण: अमेरिका, जर्मनी, रशिया, जपान.<br>(३) औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण. |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| १९. | **<u>राष्ट्र- राज्य व्यवस्था:</u>**<br>(१) १९ व्या शतकातील राष्ट्रवादाचा उदय.<br>(२) राष्ट्रवाद: जर्मनी आणि इटलीमधील राष्ट्रउभारणी. जगभरातील राष्ट्रीयत्वाच्या उदयाच्या पार्श्वभूमीवर जगभरातील साम्राज्यांचे विघटन. |
| २०. | **<u>साम्राज्यवाद आणि वसाहतवाद</u>**<br>(१) दक्षिण आणि दक्षिण - पूर्व आशिया<br>(२) लॅटिन अमेरिका आणि दक्षिण अफ्रिका<br>(३) ऑस्ट्रेलिया<br>(४) साम्राज्यवाद आणि मुक्त व्यापार: नवसाम्राज्यवादाचा उदय. |
| २१. | **<u>क्रांती आणि प्रति राज्यक्रांती</u>**<br>(१) 19 व्या शतकातील युरोपियन राज्यक्रांत्या (१८३० व १८४८)<br>(२) रशियन राज्यक्रांती (१९१७-१९२१)<br>(३) फॅसिस्ट प्रतिक्रांती, इटली आणि जर्मनी<br>(४) चीनची राज्यक्रांती १९४९. |
| २२. | **<u>जागतिक महायुद्धे:</u>**<br>(१) पहिले व दुसरे जागतिक महायुध्द- सामाजिक परिणाम.<br>(२) पहिले महायुद्ध : कारणे व परिणाम<br>(३) दुसरे महायुद्ध : कारणे व परिणाम. |
| २३. | **<u>दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरचे जग:</u>**<br>(१) दोन महासत्तांचा उदय<br>(२) तिसऱ्या जगाचा उदय आणि असंलग्नतावादाचा उदय.<br>(३) संयुक्त राष्ट्र संघटना आणि जागतिक विवाद. |
| २४. | **<u>वसाहती राजवटीपासून मुक्ती:</u>**<br>(१) लॅटीन अमेरिका – सायमन बोलिव्हर<br>(२) अरब जगत - इजिप्त<br>(३) अफ्रिका – वर्णभेद ते लोकशाही<br>(४) दक्षिण-पूर्व आशिया – व्हिएतनाम |
| २५. | **<u>निर्वसाहतीकरण आणि अविकसित राष्ट्र:</u>**<br>विकासात अडथळा निर्माण करणारे घटक; लॅटिन अमेरिका, अफ्रीका. |
| २६. | **<u>युरोपचे एकीकरण</u>**<br>(१) युध्दानंतरच्या संघटना, नाटो आणि युरोपियन समुदाय.<br>(२) युरोपियन समुदायाचे एकीकरण आणि विस्तार.<br>(३) युरोपियन संघ. |
| २७. | **<u>सोव्हिएत संघाचे विघटन आणि एकध्रुवीय जगाचा उदय :</u>**<br>(१) सोव्हिएत साम्यवाद आणि सोव्हिएत संघाचे विघटन होण्यातील प्रमुख घटक (१८८५ - १९९१).<br>(२) पूर्व युरोपमधील राजकीय बदल (१९८९ - २००१)<br>(३) शीत युद्धाचा शेवट आणि एकमेव महासत्ता म्हणून जगावर अमेरिकेचा उदय. |



MPSCDaily.com

# (१३) कायदा (माध्यम- मराठी व इंग्रजी)

| | पेपर-एक (विषय सांकेतांक १०३३) |
|---|---|
| १. | **संविधानात्मक व प्रशासकीय कायदा :**<br>१. संविधान आणि संविधानवाद : संविधानाची विभिन्न वैशिष्ट्ये.<br>२. मूलभूत हक्क- जनहित याचिका; कायदेविषयक साहाय्य; विधि सेवा प्राधिकरण.<br>३. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांच्यामधील संबंध.<br>४. राष्ट्रपतीचे संविधानात्मक स्थान आणि मंत्री परिषदेशी संबंध.<br>५. राज्यपाल आणि त्यांचे अधिकार<br>६.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये:<br>(अ) नियुक्त्या आणि बदल्या.<br>(ब) अधिकार, कार्ये आणि अधिकारिता.<br>७. केंद्र, राज्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्था :<br>(अ) केंद्र व राज्ये यांच्यामध्ये वैधानिक अधिकारांचे वितरण.<br>(ब) स्थानिक स्वराज्य संस्था.<br>(क) केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांमधील प्रशासकीय संबंध.<br>(ड) उत्कृष्ट कार्यक्षेत्र (डोमेन) - राज्य मालमत्ता — सामाईक मालमत्ता- समुदाय मालमत्ता. |
| ८. | वैधानिक अधिकार, विशेषाधिकार आणि (सुरक्षितता) उन्मुक्तता. |
| ९. | केंद्र व राज्यांच्या अंतर्गत सेवा :<br>(अ) सेवाप्रवेश व सेवाशर्ती, घटनात्मक संरक्षण, प्रशासकीय न्यायाधिकरणे.<br>(ब) संघ लोक सेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोग - अधिकार व कार्ये.<br>(क) निवडणूक आयोग - अधिकार व कार्ये. |
| १०. | आणीबाणीसंबंधी तरतुदी. |
| ११. | संविधान दुरुस्ती. |
| १२. | नैसर्गिक न्यायाचे तत्त्व- उदयोन्मुख दृष्टिकोन आणि न्यायिक दृष्टिकोन. |
| १३. | सोपविलेले विधीविधान आणि त्यांची संविधानात्मकता. |
| १४. | अधिकारांचे विलगीकरण आणि संविधानिक शासन प्रणाली. |
| १५. | प्रशासकीय कारवाईचा न्यायिक पुनरावलोकन. |
| १६. | ऑंबडस्मन: लोकायुक्त, लोकपाल इत्यादी. |

| **२.** | **आंतरराष्ट्रीय कायदा:** |
|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप व व्याख्या. |
| २. | आंतरराष्ट्रीय कायदा आणि राष्ट्रीय कायदा यांच्यातील संबंध. |
| ३. | राज्य मान्यता आणि राज्य उत्तराधिकार. |
| ४. | समुद्र कायदा: देशांतर्गत जल, प्रादेशिक समुद्र, संलग्न क्षेत्र, सामुद्रीक खंड, विशेष आर्थिक क्षेत्र आणि सामायिक समुद्र क्षेत्र. |
| ५. | व्यक्ती: राष्ट्रीयता, निर्वासितता, त्यांचे मानवी हक्क आणि अंमलबजावणीसाठी उपलब्ध कार्यपध्दती. |
| ६. | राज्यांची क्षेत्रीय अधिकारिता, प्रत्यर्पण आणि आश्रय. |
| ७. | करार : रचना, अंमलबजावणी, समाप्ति आणि आरक्षण. |
| ८. | संयुक्त राष्ट्रे : प्रधान अंगे, अधिकार व कार्ये आणि सुधारणा. |
| ९. | शांततापूर्ण विवाद समझोता - विविध पद्धती. |
| १०. | आक्रमण, स्व-संरक्षण, हस्तक्षेप करायला भाग पाडण्यासाठी कायदेशीर आधार. |


MPSCDaily.com

| | |
|---|---|
| ११. | आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याची मूलभूत तत्वे, आंतरराष्ट्रीय करार आणि समकालीन घडामोडी. |
| १२. | आण्विक शस्त्रांच्या वापराची वैधता ; आण्विक शस्त्रांच्या चाचणीवर बंदी, आण्विक प्रसारबंदी करार, सीटीएसटी. |
| १३. | आंतरराष्ट्रीय दहशतवाद, राज्य पुरस्कृत दहशतवाद, अपहरण, आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय. |
| १४. | नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था आणि मौद्रिक कायदा: डब्ल्यूटीओ, टीआरआय/पीएस, गॅट, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक. |
| १५. | मानवी पर्यावरण संरक्षण व सुधारणा: आंतरराष्ट्रीय प्रयत्न. |

| | पेपर- दोन (विषय सांकेताक १०३४) |
|---|---|
| १. | फौजदारी कायदा :<br>१. फौजदारी दायित्वाची सर्वसाधारण तत्वे:- अपराधी मन आणि ॲक्टस रियस, वैधानिक अपराधामध्ये अपराधी मन<br>२. शिक्षेचे प्रकार आणि फाशीची शिक्षा रद्द करण्याविषयीचे उद्गामी प्रवाह.<br>३. गुन्ह्याची तयारी आणि गुन्ह्याचा प्रयत्न<br>४. सर्वसाधारण अपवाद<br>५. संयुक्त व रचनात्मक दायित्व<br>६. गुन्ह्यास प्रवृत्त करणे<br>७. गुन्हेगारी कट<br>८. राज्यविरोधी अपराध<br>९. सार्वजनिक शांततेविरोधातील अपराध<br>१०. मानवी शरीराविरोधी अपराध<br>११. मालमत्ता विरोधी अपराध<br>१२. महिलांविरोधी अपराध<br>१३. बदनामी<br>१४. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८.<br>१५. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ व त्यानंतरच्या वैधानिक घडामोडी.<br>१६. तडजोडीची विनंती. |
| २. | अपकृतीचा कायदा<br>१. स्वरूप व व्याख्या<br>२. दोषावर आधारित दायित्व व काटेकोर दायित्व; निरपवाद दायित्व.<br>३. राज्य दायित्वासह अप्रत्यक्ष उत्तरदायित्व.<br>४. सर्वसाधारण बचाव.<br>५. संयुक्त अपकृति फेसर्स (Fessors).<br>६. उपाय<br>७. निष्काळजीपणा<br>८. बदनामी<br>९. उपद्रव<br>१०. षडयंत्र<br>११. अवैध तुरुंगवास<br>१२. दुर्भावनापूर्ण खटला.<br>१३. ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| ३. | **करार कायदा व व्यापारी कायदा.**<br>१. करार / ई-कराराचे स्वरूप व रचना.<br>२. मुक्त संमती परिणामशून्य करणारे घटक<br>३. निरर्थक, रद्द करण्याजोगे, अनधिकृत आणि अंमलात न आणण्याजोगे करार<br>४. कराराचे कार्यप्रदर्शन आणि निर्वहन.<br>५. साधर्म करार.<br>६. करार भंगाचे परिणाम.<br>७. नुकसानभरपाई, हमी आणि विमा करार<br>८. एजन्सीचा करार.<br>९. वस्तू विक्री आणि भाड्याने खरेदी<br>१०. भागीदारीची रचना व विघटन.<br>११. परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१.<br>१२. लवाद व समेट अधिनियम, १९९६<br>१३. करारांचे प्रमाण नमुने. |
| ४. | **समकालीन कायद्याचा विकास**<br>१. जनहित याचिका<br>२. बौद्धिक संपदा हक्क - संकल्पना, प्रकार/ संभाव्य संधि<br>३. सायबर कायद्यांसह माहिती तंत्रज्ञान कायदा- संकल्पना, प्रयोजन/ संभाव्य संधि<br>४. स्पर्धा कायदा - संकल्पना, प्रयोजन/संभाव्य संधि<br>५. पर्यायी विवाद निराकरण- संकल्पना, प्रकार / संभाव्य संधि<br>६. पर्यावरण कायद्याशी संबंधित प्रमुख अधिनियम<br>७. माहितीचा अधिकार अधिनियम<br>८. माध्यमांद्वारे न्याय चाचणी |



MPSCDaily.com

# (१४) व्यवस्थापन (माध्यम- मराठी व इंग्रजी )

| | पेपर- एक (विषय सांकेतांक - १०३५) |
|---|---|
| | उमेदवाराने व्यवस्थापनाची विज्ञान आणि कला यांच्या स्वरूपातील संकल्पना आणि विकास याचे अध्ययन केले पाहिजे आणि व्यवस्थापनाच्या अग्रगण्य विचारवंतांचे योगदान विचारात घेतले पाहिजे आणि धोरणात्मक व परिणामकारक परिस्थितीतील बदल लक्षात घेऊन, त्या संकल्पनांना वास्तविक शासन आणि व्यवसाय निर्णय प्रक्रियेमध्ये लागू केल्या पाहिजेत. |
| १. | **व्यवस्थापकीय कार्य आणि प्रक्रिया :**<br>व्यवस्थापनाची संकल्पना आणि अधिष्ठान, व्यवस्थापनाच्या उत्क्रांतीचे चिंतन, व्यवस्थापकीय कार्ये- नियोजन करणे, आयोजन करणे, नियंत्रण ठेवणे, निर्णय घेणे; व्यवस्थापकाची भूमिका, व्यवस्थापकीय कौशल्ये; उद्योजकता; नवोपक्रमाचे व्यवस्थापन; जागतिक वातावरणात व्यवस्था करणे, लवचिक पद्धति व्यवस्थापन; सामाजिक जबाबदारी आणि व्यवस्थापकीय नीतितत्व प्रक्रिया आणि ग्राहक अभिमुखीकरण; प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मूल्यशृंखलेवर व्यवस्थापकीय प्रक्रिया. लिंग समतोल प्रतिबिंबीत करणारे कार्यबल असावे यासाठी सरकार प्रयत्नशील आहे आणि महिला उमेदवारांना अर्ज करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. |
| २. | **संघटनात्मक वर्तणूक आणि अभिकल्प:**<br>संघटनात्मक वर्तणुकीचे संकल्पनात्मक प्रतिमान व्यक्तिगत प्रक्रिया — व्यक्तिमत्व मूल्ये आणि प्रवृत्ति, समज, प्रेरणा अध्ययन आणि सबळीकरण, कामाचा ताण आणि ताण व्यवस्थापन;<br>संघटनात्मक वर्तणुकीची गतिशीलता - सत्ता आणि राजकारण,संघर्ष आणि वाटाघाटी, नेतृत्व प्रक्रिया आणि शैली, संप्रेषण; संघटनात्मक प्रक्रिया- निर्णयन, कार्य आराखडा; संघटनात्मक संकल्पनेचा अभिजात, नवाभिजात आणि आकस्मिक दृष्टिकोन, संघटनात्मक सिद्धांत आणि आराखडा - संघटनात्मक संस्कृती. सांस्कृतिक विविधतेची व्यवस्था करणे, संघटन अध्ययन; संघटनात्मक परिवर्तन आणि विकास; ज्ञानाधारित उपक्रम - पद्धती आणि प्रक्रिया; संजालित आणि आभासी संघटना. |
| ३. | **मानव संसाधन व्यवस्थापन:**<br>मानव संसाधनातील आव्हाने; मानव संसाधन व्यवस्थापनाची कार्ये; मानव संसाधन व्यवस्थापनातील भविष्यातील आव्हाने, मानव संसाधनाचे धोरणात्मक व्यवस्थापन; मानव संसाधनाचे नियोजन: कार्य विश्लेषण कार्य मूल्यांकन, भरती आणि निवड;<br>प्रशिक्षण आणि विकास; पदोन्नती आणि बदली; कामगिरी व्यवस्थापन, मोबदला व्यवस्थापन लाभ; कर्मचाऱ्याचे मनोधैर्य आणि उत्पादकता, संघटनात्मक वातावरण औद्योगिक संबंध व्यवस्थापन; मानव संसाधन लेखा आणि लेखापरीक्षण; मानव संसाधन माहिती यंत्रणा ; आंतरराष्ट्रीय मानव संसाधन व्यवस्थापन. |
| ४. | **व्यवस्थापकांकरिता लेखांकन:**<br>वित्तीय लेखांकन - संकल्पना, महत्त्व आणि व्याप्ति, सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखांकन तत्वे, व्यवसाय मिळकतीचे विशेष संदर्भासह वित्तीय ताळेबंद आणि मोजणी करणारी वित्तीय विवरणपत्रे तयार करणे, वस्तुसूची मूल्यांकन आणि घसारा, वित्तीय विवरणपत्र, विश्लेषण, निधी प्रवाह विश्लेषण, रोख प्रवाहांचे विवरणपत्र; व्यवस्थापन लेखांकन संकल्पना, गरज, महत्त्व आणि व्याप्ति;<br>परिव्यय लेखांकन - अभिलेख आणि प्रक्रिया, परिव्यय खातेवही आणि नियंत्रण लेखे, वित्तीय व परिव्यय लेख्यांमधील आपसमेळ आणि एकात्मिकरण वरकड परिव्यय आणि नियंत्रण कार्य आणि प्रक्रिया परिव्ययांकन, अर्थसंकल्प आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण, प्रस्तावित कामगिरी अंदाजपत्रक, शून्याधारित अर्थसंकल्पन संबद्ध परिव्ययांकन आणि निर्णयनाकरिता परिव्ययांकन, मानक परिव्ययांकन आणि प्रचरण विश्लेषण, सीमांतिक परिव्ययांकन आणि अंतर्लामी परिव्ययांकन. |
| ५. | **वित्तीय व्यवस्थापन :**<br>वित्त फलनाचे ध्येय, मूल्य आणि परतावा यांच्या संकल्पना, बंधपत्र आणि भाग यांचे मूल्यांकन; खेळत्या भांडवलाचे व्यवस्थापन : अंदाज आणि वित्तव्यवस्था; रोखीचे व्यवस्थापन, प्राप्य, वस्तुसूची आणि चालू दायित्वे; भांडवल परिव्यय ; भांडवली अर्थसंकल्पन; वित्तीय आणि कार्यवाहक गुणक लाभ; भांडवल संरचनेचे संकल्पन: सिद्धांत आणि कार्यपद्धति; भागधारक मूल्यनिर्मिती ; लाभांश धोरण, निगम वित्तीय धोरण व कार्यनीती, निगम संकट व पुनर्रचना कार्यनीती; भांडवल आणि पैसा बाजार : संस्था आणि संलेखे, पट्ट्याने देणे, भाडे खरेदी व साहस भांडवल; भांडवल बाजाराचे नियमन; |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| | जोखीम आणि परतावा : रोखसंग्रह सिद्धांत; भांडवली मत्ता किंमत निर्धारण प्रतिमान (सीएपीएम); मूल्यांतर पणन सिद्धांत (एपीटी); वित्तीय साधिते : विकल्प, वायदे, अदलाबदल; वित्तीय क्षेत्रामधील अलीकडील सुधारणा. |
| ६. | **पणन व्यवस्थापन:**<br>संकल्पना, उत्क्रांति आणि व्याप्ती; पणन धोरणाची मांडणी आणि पणन योजनेचे घटक; बाजाराची विभागणी आणि लक्ष्यीकरण करणे; बाजार उपायनाचे स्थानन व विभेदन; स्पर्धेचे विश्लेषण करणे; ग्राहक बाजारांचे विश्लेषण करणे, औद्योगिक खरेदीदार वर्तन, बाजार संशोधन, उत्पादन कार्यनीती; किंमत निर्धारण कार्यनीती; पणन वाहिन्यांचे संकल्पन आणि व्यवस्था करणे; एकात्मिक पणन संचार; ग्राहक समाधानाची पूर्तता करणे, मूल्यांकन व प्रतिधारण ; सेवा आणि ना-नफा पणन; पणन नीति; ग्राहक संरक्षण; अंतरजालीय पणन, किरकोळ व्यवस्थापन, ग्राहक संबंध व्यवस्थापन; साकल्यपणन संकल्पना. |

| | पेपर - दोन (विषय सांकेतांक - १०३६) |
|---|---|
| १. | **निर्णयनातील परिमाणात्मक तंत्रे :**<br>वर्णनात्मक सांख्यिकी - सारणीरूप, आलेखीय आदी संख्यात्मक पद्धती, संभाव्यतेची ओळख, विविक्त आणि निरंतर संभाव्यता वितरणे, आनुमानिक सांख्यिकी नमुने वितरण, केंद्रीय सीमा प्रमेय, माध्य आणि प्रमाण यांच्यातील फरकाकरिता गृहीतक चाचणी करणे, लोकसंख्या तफावतीविषयी अनुमान, कार्य वर्ग (chisquare) आणि (ॲनोवा) तफावत विश्लेषणे, सरल सहसंबंध व समाश्रयण, कालमालिका आणि पूर्वानुमान, निर्णय सिद्धांत, निर्देशांक, रेखीय कार्यक्रमण - समस्या मांडणी, एकपथी पद्धती आणि आलेखीय उकल, संवेदनशीलता विश्लेषण. |
| २. | उत्पादन आणि कार्यचालन व्यवस्थापन:<br>कार्यचालन व्यवस्थापनाची मूलभूत तत्वे; उत्पादनार्थ आयोजन, समग्र उत्पादन नियोजन, क्षमता नियोजन, संयंत्र रचना; प्रक्रिया नियोजन, संयंत्र आकार आणि कार्य प्रमाण, सुविधा व्यवस्थापन, क्रिया केंद्र संतुलन ; प्रतिस्थापना आणि देखभाल; उत्पादन नियंत्रण, पुरवठा, शृंखला व्यवस्थापन –विक्रेता मुल्यमापन आणि लेखापरीक्षा; गुणवत्ता व्यवस्थापन; सांख्यिकीय प्रक्रिया नियंत्रण, षटसिग्मा व्यवस्थापन (सिक्स सिग्मा); उत्पादन प्रणालीमधील लवचिकता व चपळता ; जागतिक दर्जाचे वस्तुनिर्माण, प्रकल्प व्यवस्थापन संकल्पना, संशोधन व विकास व्यवस्थापन, सेवा कार्यांचे व्यवस्थापन, सामग्रींच्या व्यवस्थापनाची भूमिका व महत्त्व, मुल्य विश्लेषण, निमिर्ती वा खरेदी निर्णय, वस्तुसाठा नियंत्रण, कमाल किरकोळ किंमत (एमआरपी), कचरा व्यवस्थापनः |
| ३. | **व्यवस्थापन माहिती प्रणाली:**<br>माहिती प्रणालीचा संकल्पनात्मक पाया; माहिती सिद्धांत; माहिती स्रोत व्यवस्थापन; माहिती प्रणालीचे प्रकार: प्रणाली विकास - प्रणाली व संकल्पन यांचे विहंगावलोकन; प्रणाली विकास व्यवस्थापन जीवन-चक्र. संजाल संकल्पन (ऑनलाईन) आणि बहुवितरणक्षम व्यवस्था; प्रकल्पाची अंमलबजावणी व नियंत्रण; माहिती तंत्रज्ञानातील कल; विदास्रोताची व्यवस्था करणे - विदाआयोजन. निर्णय पूरक प्रणाली (डिएसएस) आणि परस्परसंबंधी विदागार व्यवस्थापन प्रणाली (आरडीबीएमएस), उपक्रम संसाधन नियोजन (इआरपी), तज्ज्ञ प्रणाल्या, ई-व्यवसाय संरचना, ई-प्रशासन, माहिती प्रणाल्यांची योजना, माहिती प्रणालीतील लवचिकता; वापरकर्त्यांची अंतर्भूर्तता; माहिती प्रणालीचे मूल्यमापन. |
| ४. | **शासन आणि व्यवसाय सहयोग :**<br>व्यवसायामध्ये राज्याचा सहभाग, भारतातील शासन, व्यवसाय व विविध वाणिज्य मंडळे आणि उद्योग यांच्यामधील अनोन्यक्रिया; लघु उद्योगाशी संबंधित शासनाचे धोरण; नवीन उपक्रम स्थापन करण्याकरिता शासनाचे निपटारे; सार्वजनिक वितरण प्रणाली, किंमत आणि वितरणावरील शासनाचे नियंत्रण; ग्राहक संरक्षण अधिनियम (सीपीए) आणि ग्राहकांच्या अधिकारांच्या संरक्षणातील स्वयंसेवी संघटनांची भूमिका; शासनाचे नवउद्योग धोरण; उदारीकरण, अविनियमन आणि खाजगीकरण, भारतीय नियोजन प्रणाली; मागास क्षेत्र/ प्रदेश यांच्या विकासाशी संबंधित शासनाचे धोरण; पर्यावरण संरक्षणाकरिता व्यवसाय क्षेत्राच्या तसेच शासनाच्या जबाबदाऱ्या ; निगम शासन; सायबर कायदे. |
| ५. | **धोरणविषयक परिव्यय व्यवस्थापन:**<br>अभ्यासक्षेत्र म्हणून व्यवसाय धोरण; धोरणविषयक व्यवस्थापनाचे स्वरुप आणि व्याप्ती, धोरणात्मक उद्देश दृष्टी, उद्दिष्टे आणि धोरणे; धोरणविषयक नियोजनाची प्रक्रिया आणि अंमलबजावणी; वातावरणीय विश्लेषण आणि अंतर्गत विश्लेषण, बल-दौर्बल्य-संधी-धोका (एस डब्ल्यू ओ टी) विश्लेषण; धोरणविषयक विश्लेषणाकरिता साधने आणि तंत्र- आघात सारणी : अनुभव वक्र, बीसीजी ( बोस्टॉन संमंत्रक गट) सारणी, जीईसी रिती, उद्योग विश्लेषण, |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| | मूल्यश्रृंखलेची संकल्पना; संस्थेची धोरणविषयक रुपरेखा; स्पर्धा विश्लेषणाकरिता ढाचा; संस्थेचे स्पर्धात्मक फायदे; सामान्य स्पर्धात्मक धोरणे; वृद्धि धोरणे - विस्तार, एकात्मिकरण आणि विविधीकरण; मुख्य क्षमतांची संकल्पना, धोरणविषयक लवचिकता, पुनर्शोध धोरण; धोरण आणि संरचना; मुख्य कार्यकारी आणि मंडळ, घूर्णन पुनर्नूतनीकरण व्यवस्थापन, धोरणविषयक परिवर्तनाचे व्यवस्थापन, धोरणविषयक युती, विलीनीकरणे आणि संपादने; भारतीय संदर्भात धोरण आणि निगम उत्क्रांती. |
| ६. | **<u>आंतरराष्ट्रीय व्यवसाय:</u>**<br>आंतरराष्ट्रीय व्यवसाय वातावरण: वस्तु आणि सेवा यांमधील व्यापाराचे बदलते संघटन; भारताचा विदेशी व्यापार : धोरण आणि कल ; आंतरराष्ट्रीय व्यापारातील वित्तव्यवस्था; प्रादेशिक आर्थिक सहकार ; मुक्त व्यापार करार (एफटीए); सेवा संस्थांचे आंतरराष्ट्रीयीकरण; आंतरराष्ट्रीय उत्पादन; आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील कार्य व्यवस्थापन; आंतरराष्ट्रीय कराधान : जागतिक स्पर्धात्मकता आणि तंत्रज्ञानात्मक विकास; जागतिक ई-व्यवसाय; जागतिक संस्थात्मक संरचना व नियंत्रण संकल्पन, बहुविविध संवर्धन व्यवस्थापन; जागतिक व्यवसाय धोरण, जागतिक पणन धोरणे; निर्यात व्यवस्थापन; आयात-निर्यात कार्यपध्दती; संयुक्त उपक्रम; विदेशी गुंतवणूक : विदेशी थेट गुंतवणूक आणि विदेशी रोखासंग्रह गुंतवणूक, सीमोल्लंघी विलीनीकरण आणि संपादन ; विदेश चलन जोखीम अनावृत्ती व्यवस्थापन; जागतिक वित्तीय बाजार आणि आंतरराष्ट्रीय बँक व्यवसाय ; बाह्य ऋण व्यवस्थापन; देशाचे जोखीम विश्लेषण. |



MPSCDaily.com

# (१५) मराठी साहित्य (माध्यम - मराठी)

| पेपर — एक (विषय सांकेतांक १०३७) | |
|---|---|
| १ | **भाग-अ**<br><br>**भाषा आणि लोकसाहित्य**<br><br>**(अ)** भाषेचे स्वरूप आणि कार्ये (मराठीच्या संदर्भासह)<br>भाषा-एक संकेतप्रणाली: भाषा आणि भाषण; पायाभूत कार्ये; काव्यात्मक भाषा; प्रमाण भाषा आणि बोली; सामाजिक परिमाणानुसार भाषिक वैविध्ये. तेराव्या शतकातील आणि सतराव्या शतकातील मराठीची भाषिक वैशिष्ट्ये.<br>**(ब)** मराठीच्या बोली — अहिराणी; वऱ्हाडी; डांगी.<br>**(क)** मराठी व्याकरण — शब्दांच्या जाती; विभक्ती विचार, प्रयोगविचार.<br>**(ड)** लोकसाहित्याचे स्वरूप आणि प्रकार (मराठीच्या विशेष संदर्भासह) लोकगीत, लोककथा, लोकनाट्य |
| २ | **भाग ब**<br><br>**साहित्य आणि साहित्यसमीक्षेचा इतिहास**<br><br>**(अ) मराठी साहित्याचा इतिहास**<br>**(१)** इ. स. १८१८ च्या प्रारंभापासून खालील मुद्दांच्या विशेष संदर्भासह: महानुभाव लेखक, वारकरी कवी, पंडीत कवी, शाहीर, बखर साहित्य.<br>**(२)** सन १८५० ते १९९०, खालील प्रमुख वाङमय प्रकारांच्या वाटचालीच्या विशेष संदर्भात; काव्य, कथात्म साहित्य (कादंबरी आणि लघुकथा), नाट्य; आणि मुख्य साहित्यिक प्रवाह आणि चळवळी, स्वच्छंदतावादी, वास्तववादी, आधुनिकतावादी, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी.<br>**(ब) साहित्य समीक्षा**<br>१. साहित्याचे स्वरूप व कार्य ;<br>२. साहित्याचे मूल्यांकन ;<br>३. साहित्य समीक्षेचे स्वरूप, उद्दिष्टे आणि पद्धती;<br>४. साहित्य, संस्कृती आणि समाज. |

| पेपर — दोन (विषय सांकेतांक १०३८)<br>(उत्तरे मराठीतच लिहावीत)<br>नेमलेल्या साहित्यकृतींचा संहितालक्ष्यी अभ्यास | |
|---|---|
| या अभ्यासपत्रिकेकरीता नेमलेल्या साहित्यकृतींचे प्रत्यक्ष वाचन आवश्यक आहे. उमेदवारांच्या साहित्यिक क्षमतांचे मूल्यमापन यात अपेक्षित आहे. | |
| १ | **भाग अ**<br>**(गद्य)**<br>(१) 'स्मृतिस्थळ'<br>(२) महात्मा ज्योतीबा फुले — 'शेतकऱ्याचा असूड' 'सार्वजनिक सत्यधर्म'<br>(३) श्री. व्यं. केतकर — 'ब्राह्मणकन्या'<br>(४) प्र. के. अत्रे — 'साष्टांग नमस्कार'<br>(५) शरच्चंद्र मुक्तिबोध — 'जन हे वोळतु जेथे'<br>(६) उद्धव शेळके — शिळान<br>(७) बाबुराव बागुल — 'जेव्हा मी जात चोरली होती'<br>(८) गौरी देशपांडे — 'एकेक पान गळावया'<br>(९) प्र. ई. सोनकांबळे — 'आठवणींचे पक्षी' |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| २ | **भाग ब**<br>**(काव्य)**<br>(१) 'नामदेवांची अभंगवाणी' – संपा : इनामदार, रेळेकर, मिरजकर, मॉडर्न बुक डेपो, पुणे<br>(२) 'पैंजण' – संपा: म. ना. अदवंत, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर<br>(३) 'दमयंती – स्वयंवर' – रघुनाथ पंडीत<br>(४) 'बालकवींची कविता ' - बालकवी<br>(५) 'विशाखा' – कसुमाग्रज<br>(६) मृद्गगंध – विं. दा. करंदीकर<br>(७) 'जाहीरनामा' – नारायण सुर्वे<br>(८) 'संध्याकाळच्या कविता' - ग्रेस<br>(९) 'या सत्तेत जीव रमत नाही' – नामदेव ढसाळ |



MPSCDaily.com

# (१९) तत्वज्ञान (माध्यम-मराठी व इंग्रजी)

| पेपर – एक (विषय सांकेतांक १०४५) | |
|---|---|
| **इतिहास आणि तत्वज्ञानाच्या समस्या** | |
| १. | प्लेटो आणि ॲरिस्टॉटल: कल्पना; पदार्थ; द्रव्य आणि रुप; कार्यकारणभाव; वास्तविकता आणि शक्यता. |
| २. | बुध्दिप्रामाण्यवाद (देकार्ते, स्पीनोझा, लीबनज्); कार्टेशियन पद्धत आणि विवक्षित ज्ञान; पदार्थ; ईश्वर; मन:शरीर व्दैतवाद; नियतवाद आणि स्वातंत्र्य. |
| ३. | अनुभववाद (लॉक, बर्कली, हयूम): ज्ञानाचा सिद्धांत; पदार्थ आणि गुणधर्म; आत्मतत्व आणि ईश्वर; संशयवाद. |
| ४. | कांट: संश्लेषक अनुभवपूर्व विधानाची शक्यता; दिक्काल; प्रकार; तर्क कल्पना; द्वंद्वापत्ती; ईश्वराच्या अस्तित्वाच्या प्रमाणांकरिता मीमांसा. |
| ५. | हेगेल: विरोध विकासी पद्धत; केवल चिद्वाद. |
| ६. | मूर, रसेल आणि पुर्वकालिन विटगेन्स्टाईन: सामान्य बुद्धिचे संरक्षण; चिद्वदाचे खंडन, तार्किक समष्टिवाद; तार्किक रचना, अपूर्ण प्रतीके; अर्थाचा चित्र सिद्धांत; म्हणणे आणि दाखवणे. |
| ७. | तार्किक प्रत्यक्षार्थवाद : अर्थाचा पडताळणी सिद्धांत; सत्ताशास्त्राचा अस्वीकार; आवश्यक विधानांचा भाषिक सिद्धांत |
| ८. | उत्तरकालीन विटगेनस्टाईन: अर्थ आणि उपयोग; भाषिक खेळ; खाजगी भाषांची मीमांसा. |
| ९. | प्रत्ययवाद (हुसेल): पद्धती; 'सारतत्व' ची उपपत्ती; मानसशास्त्र प्राधान्यवादाचे वर्जन. |
| १०. | अस्तित्ववाद (किर्कगर्ड, सार्त्र, हायदेगर) : अस्तित्व आणि तत्व; पर्याय निवड, जबाबदारी आणि अस्सल अस्तित्व; जगातील सदवस्तु आणि कालिकता |
| ११. | क्वाइन आणि स्ट्रॉसन : अनुभववादाची मीमांसा; मूलभूत तपशील व व्यक्ती यांचा उपपत्ती |
| १२. | चार्वाक: ज्ञानाची उपपत्ती, इंद्रीयातील तत्वांचे खंडण. |
| १३. | जैन: सत् तत्व सिद्धांत; सप्तभंगी न्याय; बंध आणि मुक्ती. |
| १४. | बौद्ध संप्रदाय: प्रतीत्यसमुत्पाद; क्षणिकवाद, नैरात्मवाद. |
| १५. | न्याय – वैशेषिक ; पदार्थांची उपपत्ती, दृश्याची उपपत्ती ; प्रमाण सिद्धांत; आत्ममोक्ष; ईश्वर; ईश्वराच्या अस्तित्वाची प्रमाणे; कारण उपपत्ती ; निर्मितीचा अणुसिद्धांत. |
| १६. | सांख्य; प्रकृति; पुरुष; कार्यकारणभाव; मोक्ष. |
| १७. | योग; चित्त; चित्तवृत्ती; क्लेश; समाधी; कैवल्य. |
| १८. | मीमांसा: ज्ञानमीमांसा. |
| १९. | वेदांत संप्रदाय : ब्रह्मन; ईश्वर; आत्मन; जीव; जगत्; माया; अविद्या; अध्यास; मोक्ष;अपृथकसिद्धि; पंचविधभेद |
| २०. | अरविंदो : उत्क्रांतीवाद, प्रतिसर्ग; एकात्म योग. |

| पेपर - दोन (विषय सांकेतांक १०४६) | |
|---|---|
| **१.** | **सामाजिक – राजकीय तत्वज्ञान**<br><br>१. सामाजिक आणि राजकीय आदर्श: समानता, न्याय, स्वातंत्र्य.<br>२. सार्वभौमत्व: ऑस्टीन, बोडीन, लास्की, कौटिल्य.<br>३. व्यक्ती व राज्य: अधिकार; कर्तव्ये आणि उत्तरदायित्व.<br>४. शासनाचे प्रकार: राजसत्ता; धर्मसत्ताक राज्य आणि लोकशाही.<br>५. राजकीय विचारधारा : अराज्यवाद; मार्क्सवाद व समाजवाद<br>६. मानवतावाद; धर्मनिरपेक्षता; बहुसांस्कृतिकतावाद.<br>७. गुन्हा आणि शिक्षा: भ्रष्टाचार, सामुदायिक हिंसा, नरसंहार, देहांत शिक्षा.<br>८. विकास आणि सामाजिक प्रगती.<br>९. लिंग भेदभाव: स्त्री भ्रूणहत्या, भूमि आणि संपत्ती अधिकार; सक्षमीकरण.<br>१०. जाति भेदभाव : गांधी आणि आंबेडकर |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| **२.** | <u>धर्माचे तत्वज्ञान</u><br>१. ईश्वराची संकल्पना: गुणविशेष; मानवाशी आणि जगाशी संबंध (भारतीय आणि पाश्चिमात्य).<br>२. ईश्वराच्या अस्तित्वासाठीचे पुरावे आणि त्याची मीमांसा (भारतीय आणि पाश्चिमात्य).<br>३. दुरित /पापाची समस्या.<br>४. आत्मा: अमरत्व; पुनर्जन्म आणि मुक्ती.<br>५. तर्क, साक्षात्कार आणि श्रद्धा.<br>६. धर्मिक अनुभव : स्वरुप व उद्देश (भारतीय व पाश्चिमात्य)<br>७. निरिश्वर धर्म.<br>८. धर्म आणि नैतिकता.<br>९. धार्मिक बहुतत्ववाद आणि निरपेक्ष सत्याची समस्या<br>१०. धार्मिक भाषेचे स्वरुप: सदृश व प्रतिकात्मक; बोधात्मकवादी आणि अबोधात्मक. |



MPSCDaily.com

## (२१) राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध (माध्यम-मराठी व इंग्रजी)

| पेपर — एक (विषय सांकेतांक १०४९) | |
|---|---|
| १ | **राजकीय सिद्धान्त आणि भारतीय राजकारण :**<br>१. राजकीय सिद्धान्त: अर्थ आणि दृष्टिकोन.<br>२. राज्याचे सिद्धान्त: उदारमतवादी, नव-उदारमतवादी, मार्क्सवादी, बहुत्ववादी, उत्तर वासाहतिक आणि स्त्रीवादी.<br>३. न्याय: रॉल्सचा न्यायाचा सिद्धान्त आणि त्याच्या समूहलक्षी टिका यांच्या विशेष संदर्भासह न्यायाच्या संकल्पना.<br>४. समानता: सामाजिक, राजकीय व आर्थिक; समानता आणि स्वातंत्र्य यांमधील संबंध; सकारात्मक कार्यवाही.<br>५. हक्क: अर्थ व सिद्धान्त; हक्कांचे निरनिराळे प्रकार; मानवी हक्कांची संकल्पना.<br>६. लोकशाही: अभिजात व आधुनिक सिद्धान्त; लोकशाही निरनिराळे प्रतिमान — प्रातिनिधीक, सहभागी आणि विमर्शकारी.<br>७. अधिकार संकल्पना; वैचारिक धुरिणत्व, विचारप्रणाली आणि अधिमान्यता<br>८. राजकीय विचारप्रणाली: उदारमतवाद, समाजवाद, मार्क्सवाद, फॅसीझम, गांधीवाद आणि स्त्रीवाद.<br>९. भारतीय राजकीय विचारधारा: धर्मशास्त्र, अर्थशास्त्र आणि बौद्ध परंपरा; सर सय्यद अहमद खान, श्री. अरबिंदो, एम. के. गांधी, बी.आर. आंबेडकर, एम.एन.रॉय.<br>१०. पाश्चिमात्य राजकीय विचारधारा : प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकियावेली, होब्स, लॉक, जॉन एस मिल, मार्क्स, ग्रॅमसी, हन्नाह ॲरेन्ड. |
| २ | **भारतीय सरकार आणि भारतीय राजकारण**<br>१. भारतीय राष्ट्रवाद :<br>(अ) भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची राजकीय व्युहरचना: घटनावाद ते लोकसत्याग्रह, असहकार, नागरी कायदेभंग; लढाऊ आणि क्रांतिकारी चळवळी; शेतकरी व कामगार चळवळी.<br>(ब) भारतीय राष्ट्रीय चळवळीवरील दृष्टिकोन; उदारमतवादी, समाजवादी आणि मार्क्सवादी; मुलगामी मानवतावादी आणि दलित.<br>२. भारताच्या संविधानाची निर्मिती: ब्रिटिश शासनाचा वारसा, विभिन्न सामाजिक व राजकीय दृष्टिकोन.<br>३. भारतीय संविधानाची ठळक वैशिष्ट्ये: उद्देशिका, मूलभूत हक्क व कर्तव्ये, निदेशक तत्वे, संसदीय प्रणाली व सुधारणा कार्यपद्धती: न्यायिक पुर्नविलोकन आणि मूळ संरचना सिद्धान्त.<br>४. (अ) संघ सरकारची प्रमुख अंगे: कार्यकारी, विधिमंडळ आणि सर्वोच्च न्यायालयाची परिकल्पित भूमिका आणि प्रत्यक्ष कामकाज.<br>(ब) राज्य शासनाची प्रमुख अंगे: कार्यकारी, विधिमंडळ आणि उच्च न्यायालयाची परिकल्पित भूमिका आणि प्रत्यक्ष कामकाज.<br>५. तळागाळातील लोकशाही: पंचायती राज आणि नगरपालिका शासन; ७३ व्या आणि ७४ व्या सुधारणांचे महत्त्व; तळागाळातील चळवळी.<br>६. सांविधानिक संस्था/आयोग: निवडणूक आयोग, महानियंत्रक व लेखापरीक्षक, वित्त आयोग, संघ लोकसेवा आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, राष्ट्रीय महिला आयोग; राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग.<br>७. संघराज्यवाद: सांविधानिक तरतुदी; केंद्र-राज्य संबंधांचे बदलते स्वरूप, एकात्मवादी प्रवृत्ती आणि प्रादेशिक आकांक्षा, आंतर-राज्य विवाद.<br>८. नियोजन व आर्थिक विकास : नेहरूवादी व गांधीवादी दृष्टिकोन; नियोजन व सार्वजनिक क्षेत्राची भूमिका; हरित क्रांती; जमीन सुधारणा; कृषक संबंध; उदारीकरण आणि आर्थिक सुधारणा;<br>९. भारतीय राजकारणातील जात, धर्म आणि वांशिकता.<br>१०. पक्ष प्रणाली: राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्ष, पक्षांची विचारप्रणाली आणि सामाजिक पाया, आघाड्यांच्या राजकारणाचे आकृतीबंध; दबाव गट, निर्वाचक वर्तनाच्या प्रवृत्ती; विधिकारांच्या सामाजिक - आर्थिक रुपरेखेतील बदल.<br>११. सामाजिक चळवळ: नागरी स्वातंत्र्य आणि मानवी हक्क चळवळी, महिलांच्या चळवळी आणि पर्यावरणवादी चळवळी. |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| | **पेपर - दोन (विषय सांकेतांक १०५०)**<br>**<u>तुलनात्मक राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध</u>** |
| १ | **तुलनात्मक राजकीय विश्लेषण आणि आंतरराष्ट्रीय राज्यशास्त्र.**<br>१. तुलनात्मक राज्यशास्त्र: स्वरुप आणि मुख्य दृष्टिकोन; राजकीय अर्थशास्त्र आणि राजकीय समाजशास्त्र परिप्रेक्ष्य; तुलनात्मक पद्धतीच्या मर्यादा.<br>२. तुलनात्मक परिप्रेक्षामधील राज्य: भांडवलवादी आणि समाजवादी अर्थशास्त्रातील राज्यांची वैशिष्टये आणि बदलते स्वरुप, आणि प्रगत औद्योगिक व विकसनशील समाज.<br>३. प्रतिनिधित्व आणि सहभागाचे राजकारण: राजकीय पक्ष, प्रगत औद्योगिक व विकसनशील समाजांतील दबावगट आणि सामाजिक चळवळी<br>४. जागतिकीकरण: विकसित आणि विकसनशील समाजांकडून मिळणारे प्रतिसाद.<br>५. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासातील दृष्टिकोन: आदर्शवाद, वास्तववाद, मार्क्सवाद, कार्यात्मक आणि व्यवस्था सिद्धांत.<br>६. आंतरराष्ट्रीय संबंधांतील प्रमुख संकल्पना: राष्ट्रीय हित, सुरक्षा व सत्ता, सत्तेचे संतुलन आणि प्ररोधन, राष्ट्रातीत कर्ते आणि सामूहिक सुरक्षा, जागतिक भांडवलवादी अर्थशास्त्र आणि जागतिकीकरण.<br>७. बदलती आंतरराष्ट्रीय राजकीय सुव्यवस्था:<br>(अ) महासत्तांचा उदय, रणनीती आणि विचारप्रणालीची द्विध्रुवता, शस्त्रास्त्र स्पर्धा आणि शीतयुद्ध आण्विक धोका.<br>(ब) अलिप्तता चळवळ: ध्येये व प्राप्ती.<br>(क) सोव्हिएत युनियनचे कोसळणे; एकध्रुवीयता आणि अमेरिकन वर्चस्व; समकालीन जगातील अलिप्ततेची औचित्य.<br>८. आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रणालीची उत्क्रांती: ब्रेटनवूड ते जागतिक व्यापार संघटना; समाजवादी अर्थशास्त्र आणि सीएमईए (परस्पर आर्थिक सहायता परिषद); नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची तिसऱ्या जगाची मागणी. जागतिकीकरण आणि जागतिक अर्थव्यवस्था<br>९. संयुक्त राष्ट्रे: अपेक्षित भूमिका आणि प्रत्यक्ष नोंद: विशेषिकृत संयुक्त राष्ट्र अभिकरणे – ध्येये व कार्ये; संयुक्त राष्ट्र सुधारणेची गरज.<br>१०. जागतिक राजकारणाचे प्रादेशिकीकरण: ईयु, एएसईएएन, एपीईसी, एएआरसी, एनएएफटीए.<br>११. समकालीन जागतिक चिंताविषय: लोकशाही, मानवी हक्क, पर्यावरण, लिंगभेद न्याय दहशतवाद, आण्विक वृद्धी. |
| २ | **<u>भारत आणि जग</u>**<br>१. भारतीय परराष्ट्र धोरण: परराष्ट्र धोरण निर्धारक; धोरण निश्चितीच्या संस्था, सातत्य व बदल.<br>२. विविध टप्प्यांवरील असंलग्नता चळवळीतील भारताचे योगदान; सध्याची भूमिका.<br>३. भारत आणि दक्षिण आशिया :<br>(अ) प्रादेशिक सहकार: सार्क – मागील कामगिरी आणि पुढील भवितव्य.<br>(ब) मुक्त व्यापार क्षेत्र म्हणून दक्षिण आशिया.<br>(क) भारताचे "लुक इस्ट" धोरण<br>(ड) प्रादेशिक सहकारातील अडथळे: नदीच्या पाण्याचे विवाद; अनधिकृत सीमा स्थलांतर; मानववंशीय संघर्ष आणि उठाव; सीमा वाद.<br>४. भारत आणि दक्षिण विश्व: अफ्रिका आणि लॅटीन अमेरिका यांच्याशी संबंध; एनआयइओची मागणी व जागतिक व्यापार संघटनेतील वाटाघाटीतील नेतृत्वाची भूमिका.<br>५. भारत आणि सत्तेची जागतिक केंद्रे: युएसए, इयु, जपान, चीन आणि रशिया.<br>६. भारत आणि संयुक्त राष्ट्र प्रणाली, संयुक्त राष्ट्रांच्या शांतता प्रस्थापनेच्या प्रयत्नातील भारताची भूमिका, सुरक्षा परिषदेमध्ये कायम जागेची मागणी.<br>७. भारत व आण्विक प्रश्न: बदलते दृष्टीकोन व धोरण.<br>८. भारताच्या विदेशी धोरणातील अलिकडील विकास: अफगणिस्तान, इराक आणि पश्चिम आशिया यांमधील सध्याच्या अरिष्टावर भारताचे स्थान; युएस आणि इस्त्रायलसोबत वाढते संबंध, नवीन जागतिक व्यवस्थेची दृष्टी. |



MPSCDaily.com

## (२२) मानसशास्त्र (माध्यम — मराठी व इंग्रजी)

| पेपर — एक (विषय सांकेतांक १०५१) | |
|---|---|
| | **मानसशास्त्राची मूलतत्वे** |
| १ | **प्रस्तावना**: मानसशास्त्राची व्याख्या; मानसशास्त्राचा पूर्व इतिहास आणि २१ व्या शतकातील प्रवाह; मानसशास्त्र आणि वैज्ञानिक पद्धती; अन्य समाजशास्त्र आणि नैसर्गिक विज्ञानांशी संबंधित मानसशास्त्र; सामाजिक समस्यांसाठी मानसशास्त्राचे उपयोजन. |
| २ | **मानसशास्त्राच्या पद्धती** : संशोधनाचे प्रकार : वर्णनात्मक, मूल्यांकनात्मक, निदान व सुधार चाचणी, संशोधनाच्या पद्धती; सर्वेक्षण, निरीक्षण, व्यक्ती वृत्तांत पद्धती, प्रयोग, प्रायोगिक आराखडा आणि अप्रायोगिक आराखड्याची वैशिष्ट्ये, तत्सम प्रायोगिक आराखडा, गट चर्चेवर भर देणे, विचार मंथन, पार्श्वभूमी सिद्धांत दृष्टिकोन. |
| ३ | **संशोधन पद्धती** : मानसशास्त्रीय संशोधनाचे प्रमुख टप्पे (समस्या कथन, ग्रहितकांची मांडणी, संशोधन आराखडा, नमुनाचयन, माहिती संकलनाची साधने, विश्लेषण आणि अन्वयार्थ आणि अहवाल लेखन) ; मूलभूत विरुद्ध उपयोजित संशोधन; माहिती संकलनाच्या पद्धती (मुलाखत, निरीक्षण, प्रश्नावली आणि व्यक्ती वृत्तांत पद्धती) ; संशोधन संकल्पन (कार्योत्तर आणि प्रयोगात्मक) सांख्यिकीय तंत्रांचे उपयोजन टी-चाचणी, दोन पद्धतीचे प्रसरण विश्लेषण (द्विपद्धत प्रसरण विश्लेषण) (Two way ANOVA) सहसंबंध आणि प्रतिगमन आणि घटकांचे विश्लेषण, घटक प्रतिसाद सिद्धांत |
| ४ | **मानवी वर्तनाचा विकास**: वृध्दी आणि विकास; विकासाची तत्वे, मानवी वर्तन निश्चित करतांना अनुवंशिकता आणि पर्यावरणीय घटक यांची भूमिका; सामाजिकीकरणामधील सांस्कृतिक घटकांचा प्रभाव; आयुर्मानाचा विकास-वैशिष्टे, विकास कार्ये, आयुर्मानाच्या प्रमुख टप्प्यांवर मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यास प्रोत्साहन देणे. |
| ५ | **वेदन, अवधान आणि संवेदन**: वेदन — सिमामूल्य संकल्पना, निरपेक्ष आणि भेदनिक सिमामूल्य, संकेत-शोध आणि दक्षता; उद्दीपकांची संच आणि वैशिष्टे यांसह अवधानावर प्रभाव टाकणारे घटक; संवेदनाची व्याख्या आणि संकल्पना, संवेदनेतील जैविक घटक; संवेदनात्मक संघटन-भूतकाळातील अनुभवांचा परिणाम. स्थान व घनता संवेदन घटक, अवकाश आणि प्रदीर्घ संवेदना, आकारमान अंदाज आणि संवेदन, तत्वरता करणारे संरक्षण घटक; संवेदनेची चलनशीलता; अतीद्रींय संवेदना, संस्कृति आणि संवेदन, अवसीमीय संवेदन. |
| ६ | **अध्ययन:** अध्ययनाच्या संकल्पना आणि सिद्धांत (वर्तनवादी, समष्टीवादी (Gestalt) आणि माहिती संस्करण प्रतिमाने) विलोपन, भेदन आणि सामान्यीकरण प्रक्रिया. क्रमान्वित अध्ययन, संभाव्यता अध्ययन, स्वयं निर्देशात्मक अध्ययन, प्रबलन, सुटका, अपगम आणि शिक्षा यांचे वेळापत्रक, प्रतिमान व सामाजिक अध्ययन. |
| ७ | **स्मृती:** संकेतन व आठवणी; अल्पकालिक स्मृती, दीर्घकालिक स्मृती, वेदन स्मृति, वेदनिक स्मृती, प्रतिध्वनी स्मृती; बहुसंग्रही स्मृती प्रारूप, प्रक्रियन स्तर; स्मृति वाढविण्यासाठी संघटन व स्मृतिसहाय्यक तंत्र, विस्मरणाची उपपति: ऱ्हास, व्यत्यय व प्रत्यानयन अपयश, अधिस्मृति, स्मृतिलोप- उत्तरलक्षी, पूर्वलक्षी. |
| ८ | **विचार प्रक्रिया आणि समस्या निराकरण** : पियाजे बोधात्मक विकासाचा सिद्धांत; संकल्पना घडण प्रक्रिया, माहिती संस्करण, युक्तिवाद आणि समस्या परिहार/ निराकरण, समस्येचे निराकरण करण्यातील सुकरीकरण करणारे आणि अडथळा आणणारे घटक, समस्यांचे निराकरण करण्याच्या पद्धती : सर्जनशील विचार प्रक्रिया आणि सर्जनशीलता वाढविणे; निर्णयन व निर्णय प्रक्रियेवर परिणाम करणारे घटक; अलिकडील प्रवाह. |
| ९ | **प्रेरणा व भावना**: प्रेरणा व भावना यांचा मानसशास्त्रीय व शरीरशास्त्रीय आधार; प्रेरणा आणि भावनांचे मापन, भावना आणि प्रेरणा यांचा वर्तनावरील परिणाम; बाह्य आणि आंतरिक प्रेरणा, अंतरिक प्रेरणेवर प्रभाव टाकणारे घटक, भावनिक सक्षमता आणि संबंधित समस्या. |
| १० | **बुद्धिमता आणि अधिक्षमता**: व्याख्या — बुध्दिमत्ता व अधिक्षमता, बुद्धिमत्तेचे स्वरुप आणि सिद्धांत — बुद्धिमता आणि योग्यतेची संकल्पना, स्पिअरमॅन, थर्स्टन, गिलफोर्ड, व्हर्नान, स्टर्नबर्ग आणि जे.पी. दास; भावनिक बुद्धिमत्ता, सामाजिक बुद्धिमत्ता, बुद्धिमत्ता व अधिक्षमतेचे मापन, बुद्धिगुणांक विचलन, बुद्धिगुणांक स्थिरत्व, बहुविध बुद्धीमत्तेचे मापन, प्रवाहित व पारदर्शक बुद्धिमत्ता. |


MPSCDaily.com

| | |
|---|---|
| ११ | **व्यक्तिमत्व:** व्यक्तिमत्वाची व्याख्या आणि संकल्पना; व्यक्तिमत्वाचे सिध्दांत (मनोविश्लेषणात्मक, सामाजिक, सांस्कृतिक, आंतरवैयक्तिक, विकासात्मक, मानवतावादी, वर्तनवादीय, गुण व घटक सिद्धांत); व्यक्तिमत्वाचे मोजमाप (प्रक्षेपण चाचणी, पेन्सिल पेपर चाचणी) व्यक्तिमत्वाचा भारतीय दृष्टिकोन; व्यक्तिमत्व विकासासाठी प्रशिक्षण; आधुनिक दृष्टिकोन जसे बिग ५ घटक सिद्धांत, विविध परंपरांमधील स्वसंकल्पना. |
| १२ | **अभिवृत्ती, मूल्ये आणि अभिरुची**: अभिवृत्ती, मूल्ये आणि अभिरुची यांची व्याख्या; अभिवृत्तीचे घटक, अभिवृत्तीची निर्मिती व स्थिरत्व, अभिवृत्ती, मूल्ये आणि अभिरुची यांचे मापन, अभिवृत्ती बदलाचे सिद्धांत, मुल्यवर्धनाची कार्यतंत्रे (साचेबंद धारणा व पूर्वग्रह निर्मिती) इतरांचे बदलते वर्तन, संबध सिद्धांत; आधुनिक कल. |
| १३ | **भाषा आणि संप्रेषण**: मानवी भाषा – गुणधर्म, रचना आणि भाषिक पदानुक्रम, भाषा संपादन, पूर्ववृत्ति, क्लिष्ट कालावधीतील गृहितके, भाषिक विकासाचे सिद्धांत, स्किनर आणि चॉम्स्की, संप्रेषणाची प्रक्रिया आणि प्रकार – प्रभावी सप्रेषण प्रशिक्षण. |
| १४ | **आधुनिक समकालीन मानसशास्त्रातील समस्या आणि परिप्रेक्ष्य**: मानसशास्त्रीय प्रयोगशाळेत आणि मानसशास्त्रीय चाचणीत संगणकाचे उपयोजन, कृत्रिम बुद्धिमत्ता; मानससायबरजाळे, बोधावस्था, झोपेत चालण्याच्या अवस्थांचा अभ्यास, झोपेत चालण्याचे स्वप्न, उद्दीपक वंचना, ध्यानधारणा, संमोहना औषध प्रवर्तन अवस्था, अतींद्रिय संवेदन, अंतर्ज्ञानी संवेदना, प्रारूप अभ्यास. |

| | |
|---|---|
| | **पेपर – दोन (विषय सांकेतांक १०५२)** |
| | **मानसशास्त्र : समस्या आणि उपयोजन** |
| १ | **व्यक्तिभेदांचा मानसशास्त्रीय मापन**: व्यक्तिभेदांचे स्वरुप. प्रमाणीकृत मानसशास्त्रीय चाचण्यांची वैशिष्ट्ये आणि रचना. मानसशास्त्रीय चाचण्यांचे प्रकार. मानसशास्त्रीय चाचण्यांचा वापर, गैरवापर आणि मर्यादा. मानसशास्त्रीय चाचण्यांच्या वापरातील नैतिक समस्या. |
| २ | **मानसशास्त्रीय आरोग्य आणि मानसिक विकार**: आरोग्य, अनारोग्य, धनात्मक आरोग्य याची संकल्पना, मानसिक विकारांची कारणे (चिंता, विकार, छिन्नमनस्कता आणि भ्रामक विकार; व्यक्तिमत्व विकार, अंमली पदार्थ सेवन विकार). धनात्मक आरोग्यावर परिणाम करणारे घटक; आरोग्य; जीवनशैली आणि जीवनमान; आनंदी वृत्ती. |
| ३ | **उपचारात्मक दृष्टीकोन:** मनोगतिक उपचार पद्धती, वर्तन उपचार पद्धती, रूग्णकेंद्रित उपचार पद्धती, बोधात्मक उपचार पद्धती, स्वदेशी उपचार पद्धती (योगा, ध्यान धारणा व साधना) जैवप्रतिभरण उपचार पद्धती, मानसिक रुग्णांचे प्रतिबंधन व पुनर्वसन; मानसिक आरोग्य वाढविणे. |
| ४ | **मानसशास्त्र आणि संघटनात्मक वर्तन :**<br>कर्मचारी निवड आणि प्रशिक्षण. उद्योगात मानसशास्त्रीय चाचण्यांचा वापर, प्रशिक्षण आणि मानव संशोधन विकास कार्यप्रेरणा सिद्धांत, हर्झबर्ग, मॅस्लो, अडॅम समान उपचार पद्धती, पोर्टर आणि लॉवलर, व्हूम; नैतृत्व आणि सहभागी व्यवस्थापन, जाहिरात आणि विपणन, ताण आणि त्याचे व्यवस्थापन; कार्यानुरुपणशास्त्र, ग्राहक मानसशास्त्र, व्यवस्थापकीय परिणामकारकता; परिवर्तनवादी नैतृत्व; संवेदनशील प्रशिक्षण; संघटनांमध्ये सत्ता आणि राजकारण. |
| ५ | **मानसशास्त्राचे शैक्षणिक क्षेत्रातील उपयोजन** :-<br>परिणामकारक अध्ययन – अध्यापन प्रक्रियेतील मानसशास्त्रीय तत्वे. अध्ययनाच्या शैली. प्रतिभाशाली, मतीमंद, अध्ययन अक्षमता आणि त्यांचे प्रशिक्षण. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी आणि उत्तम विद्याविषयक कामगिरीसाठी प्रशिक्षण. व्यक्तिमत्व विकास आणि मूल्य शिक्षण. शैक्षणिक, व्यावसायिक मार्गदर्शन आणि उन्नत समुपदेशन. शैक्षणिक संस्थांमध्ये मानसशास्त्रीय चाचण्यांचा वापर. मार्गदर्शन कार्यक्रमांत प्रभावी धोरणे. |
| ६ | **सामुदाय मानसशास्त्र :**<br>समुदायिक मानसशास्त्रीय व्याख्या आणि संकल्पना. सामाजिक कार्यवाहीत लहान गटांचा वापर. सामाजिक समस्या हाताळण्यासाठी सामाजिक जाणीव आणि कृती जागृत करणे. सामाजिक बदलासाठी गटचर्चा करणे आणि नेतृत्व करणे. सामाजिक बदलासाठी परिणामकारक धोरणे. |
| ७ | **पुनर्वसन मानसशास्त्र**<br>प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय प्रतिबंधक कार्यक्रमात मानसशास्त्रज्ञांची भूमिका. वयोवृद्ध व्यक्तींसह शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी सेवांचे आयोजन करणे. अंमली पदार्थांचा वापर, बाल गुन्हेगारी, गुन्हेगारी वर्तन, म्हणून पीडित व्यक्तींचे पुनर्वसन. हिंसाचाराला बळी पडलेल्यांचे पुनवर्सन. एचआयव्ही/एड्स पीडीतांचे पुनर्वसननामध्ये सामाजिक संस्थांची भूमिका. |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| ८ | **अहित गटासाठी मानसशास्त्राचे उपयोजन:** अहित गटाची संकल्पना, वंचित आणि अहित गटांवर सामाजिक वंचितता, भौतिक, सांस्कृतील, आर्थिक कारणांचा परिणाम, वंचित लोकांना शिक्षण आणि विकासासाठी प्रेरित करणे, सापेक्षा आणि प्रदीर्घ वंचितता. |
| ९ | **सामाजिक एकीकरणाची मानसशास्त्रीय समस्या:** सामाजिक एकीकरणाची संकल्पना. जात, वर्ग, धर्म आणि भाषा संघर्ष आणि पूर्वग्रहदूषित समस्या. समूह आणि समूहबाह्य घटकांमधील पूर्वग्रहदूषितांचे स्वरुप आणि प्रकटीकरण. अशा संघर्ष आणि पूर्वग्रहदूषितांचा कार्यकारण संबंध (कारणे), संघर्ष आणि पूर्वग्रह दूषितांच्या समस्या हाताळण्यासाठी मानसशास्त्रीय धोरणे. सामाजिक एकात्मता साध्य करण्यासाठी उपाययोजना. |
| १० | **माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमे यांमधील मानसशास्त्राचे उपयोजन:** माहिती तंत्रज्ञान आणि प्रसारमाध्यमे यांची सध्या चलती आणि त्यामधील मानसशास्त्रज्ञांची भूमिका - माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमे या क्षेत्रात काम करण्यासाठी व्यावसायिक मानसशास्त्रज्ञांची निवड आणि प्रशिक्षण, माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमे यांमार्फत दुरुस्त शिक्षण, वि-वाणिज्यमार्फत उद्योजगता. बहुस्तरीय विपणन. माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमे यांमार्फत जनसंपर्कद्वारे दूरदर्शनचा प्रभाव आणि त्यांचे मूल्य वाढविणे. माहिती तंत्रज्ञानातील आधुनिक विकासांचे मानसशास्त्रीय परिणाम. |
| ११ | **मानसशास्त्र आणि आर्थिक विकास:** ध्येय प्रेरणा आणि आर्थिक विकास. उद्योजकीय वर्तनाची वैशिष्टे. उद्योजगता आणि आर्थिक विकासासाठी लोकांना प्रेरणा आणि प्रशिक्षण देणे. ग्राहक हक्क आणि ग्राहक जागरूकता, महिला उद्योजकांसह तरुणांमध्ये उद्योजगतेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारी धोरणे. |
| १२ | **पर्यावरण आणि संबंधित क्षेत्रासाठी मानसशास्त्राचे उपयोजन-** पर्यावरण मानसशास्त्र- आवाज प्रदूषण आणि गर्दीचे वातावरणीय मानसशास्त्रावरील परिणाम. लोकसंख्या मानसशास्त्र : लोकसंख्येचा विस्फोट आणि अति लोकसंख्येच्या घनतेचा मानसशास्त्रीय परिणाम, लहान कुटुंबाच्या मानकांसाठी प्रेरणा देणे, पर्यावरणाच्या ऱ्हासावर जलद वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान वाढीचा परिणाम. |
| १३ | **इतर क्षेत्रांमध्ये मानसशास्त्राचे उपयोजन:**<br>(अ) **लष्करी मानसशास्त्र** सुरक्षा कर्मचारीवर्गाच्या निवडीमध्ये मानसशास्त्रीय चाचण्यांच्या वापराचे आयोजन, प्रशिक्षण, समुपदेशन; सुरक्षा कर्मचारीवर्गासह, धनात्मक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी कामाच्या ठिकाणी मानसशास्त्रज्ञांच्या प्रशिक्षणाचे आयोजन, सुरक्षाक्षेत्रात मानवी अभियांत्रिकता.<br>(ब) **क्रीडा मानसशास्त्र:** धावपटू आणि खेळाडू यांच्या कामगिरीमध्ये सुधारणा होण्यासाठी मानसशास्त्रीय उपाययोजना. वैयक्तिक आणि सांघिक खेळांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्ती.<br>(क) **पूर्व आणि समाजविरोधी वर्तनावर प्रसिद्धी माध्यमांचा प्रभाव**<br>(ड) **दहशतवाद्यांचे मानसशास्त्र** |
| १४ | **लिंगाधारित मानसशास्त्र:** लिंग भेदभावाच्या समस्या, विविधतेचे व्यवस्थापन; काच छात परिणाम, स्वयंपूर्ण परिपूर्तता, महिला आणि भारतीय समाज. |



MPSCDaily.com

# (२३) लोकप्रशासन ( मराठी व इंग्रजी माध्यम)

| | |
|---|---|
| **पेपर-एक (विषय सांकेतांक —१०५३)** | |
| **प्रशासन सिद्धांत** | |
| १ | **प्रस्तावना**:<br>लोक प्रशासनाचा अर्थ, व्याप्ती व महत्त्व, विल्सन यांची लोकप्रशासनाबद्दलची दृष्टी, अभ्यास शाखेची उत्क्रांती आणि सद्य:स्थिती; नव लोकप्रशासन; लोक/सार्वजनिक निवड दृष्टिकोन; उदारीकरण, खासगीकरण जागतिकीकरणाची आव्हाने, सुशासन: संकल्पना आणि उपयोजन; नव लोक व्यवस्थापन. |
| २ | **प्रशासकीय विचार**:<br>शास्त्रीय व्यवस्थापन आणि शास्त्रीय व्यवस्थापन चळवळ; अभिजात सिद्धांत; वेबरचे नोकरशाहीचे प्रारुप, त्याची चिकित्सा आणि वेबरोत्तर विकास, प्रशासनिक गतिशिलता ( मेरी पार्कर फॉलेट) मानवी संबंध विचार संप्रदाय एल्टन मेवो आणि अन्य<br>कार्यकारी प्रमुखाची कार्ये (सी.आय. बर्नाड), सायमनचा निर्णय निर्धारण सिद्धांत, सहभागी व्यवस्थापन (आर. लिकर्ट, सी. अर्गेरीस, डी. मॅक्ग्रेगॉर). |
| ३ | **प्रशासकीय वर्तन**<br>निर्णय निर्धारणाची प्रक्रिया व तंत्रे, संसूचन; मनोधैर्य; प्रेरणा सिद्धांताचे घटक, प्रक्रिया व समकालीनता, नेतृत्वाचे सिद्धांत: पारंपारिक व आधुनिक. |
| ४ | **संघटना**<br>सिद्धांत- व्यवस्थात्मक प्रणाली, आकस्मिकता, संरचना आणि प्रकार: मंत्रालये व विभाग, महामंडळे, कंपन्या, मंडळे आणि आयोग; तदर्थ, आणि सल्लागार संस्था; मुख्यालये आणि क्षेत्र संबंध; नियामक प्राधिकरणे; सार्वजनिक खाजगी भागीदारी. |
| ५ | **उत्तरदायित्व आणि नियंत्रण**<br>उत्तरदायित्व आणि नियंत्रण संकल्पना; प्रशासनावरील वैधानिक, कार्यकारी आणि न्यायिक नियंत्रण; नागरिक आणि प्रशासन; प्रसार माध्यमांची भूमिका, हितसंबंधी गट, स्वयंसेवी संस्था; नागरी समाज; नागरिकांची सनद, माहितीचा अधिकार; सामाजिक लेखापरीक्षण. |
| ६ | **प्रशासकीय कायदा**<br>अर्थ, व्याप्ती व महत्त्व; डायसी यांचे प्रशासकीय कायद्यावरील विचार; प्रदत्त विधिविधान; प्रशासकीय न्यायाधिकरण. |
| ७ | **तुलनात्मक लोकप्रशासन**:<br>प्रशासकीय प्रणालींवर परिणाम करणारे ऐतिहासिक आणि समाजशास्त्रीय घटक; विविध देशांतील प्रशासन आणि राजकारण; तुलनात्मक प्रशासनाची सद्य:स्थिती; पारिस्थितीकी आणि प्रशासन; रिग्ज यांची प्रारुपे व त्यांची चिकित्सा. |
| ८ | **विकासात्मक गतिशिलता :**<br>विकासाची संकल्पना; विकास प्रशासनाची बदलती रूपरेखा; 'विकास-विरोधी प्रबंध'; नोकरशाही व विकास; सक्षम राज्य विरुद्ध बाजार वादविवाद; विकसनशील देशांतील प्रशासनावर उदारीकरणाचा परिणाम; महिला व स्वयंसहाय्यता गट (बचत गट) चळवळीचा विकास. |
| ९ | **कर्मचारी प्रशासन**<br>मानव संसाधन विकासाचे महत्त्व; भरती प्रशिक्षण, व्यवसाय अभिवृद्धी, पद वर्गीकरण, शिस्त, कामगिरीचे मूल्यमापन, पदोन्नती, वेतन व सेवा शर्ती/ अटी; नियोक्ता- कर्मचारी संबंध, तक्रार निवारण यंत्रणा; आचारसंहिता; प्रशासकीय नीतितत्व. |
| १० | **सार्वजनिक धोरण**<br>धोरण निर्मितीची प्रारुपे व त्यांची चिकित्सा; संकल्पीकरणाच्या प्रक्रिया, नियोजन अंमलबजावणी, संनियंत्रण, मूल्यमापन व पुर्नविलेखन प्रक्रिया आणि त्यांच्या मर्यादा; राज्य सिद्धांत आणि सार्वजनिक धोरण मांडणी. |
| ११ | **प्रशासकीय सुधारण्याची तंत्रे**<br>संघटना व पद्धती, कार्याभ्यास व कार्य व्यवस्थापन, ई-प्रशासन आणि माहिती तंत्रज्ञान; नेटवर्क विश्लेषण, एम आय. एस; पी. इ. आर. टी; सी. पी. एम. यांसारखी व्यवस्थापन सहायक साधने. |
| १२ | **वित्तीय प्रशासन**<br>मौद्रिक व राजकोषीय धोरणे: सार्वजनिक उधारी व सरकारी ऋण, अर्थसंकल्प प्रकार आणि त्यांचे स्वरूप, अर्थसंकल्पीय प्रक्रिया, वित्तीय उत्तरदायित्व; लेखे व लेखापरीक्षण. |


MPSCDaily.com

| पेपर-दोन (विषय सांकेतांक- १०५४) | |
|---|---|
| **भारतीय प्रशासन** | |
| १ | **भारतीय प्रशासनाची उत्क्रांती:**<br>कौटिल्याचे अर्थशास्त्र; मुघल प्रशासन; राजकारण व प्रशासनातील ब्रिटिश राजवटीचा वारसा, लोकसेवांचे भारतीयकरण, महसूल प्रशासन, जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य शासन. |
| २ | **शासनाची तत्वज्ञानात्मक व संविधानिक चौकट:**<br>ठळक वैशिष्ट्ये व मुल्ये; संविधानवाद; राजकीय संस्कृती; नोकरशाही आणि लोकशाही, नोकरशाही आणि विकास. |
| ३ | **सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम:**<br>**आधुनिक भारतातील सार्वजनिक क्षेत्र**: सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे प्रकार; स्वायत्तता, उत्तरदायित्व आणि नियंत्रण विषयक समस्या; उदारीकरण आणि खाजगीकरणाचे परिणाम. |
| ४ | **केंद्र शासन आणि प्रशासन**<br>कार्यपालिका, संसद व न्यायमंडळ: रचना, कार्ये व कार्यपद्धती, सध्याचे प्रवाह, शासना अंतर्गत संबंध, मंत्रिमंडळ सचिवालय; पंतप्रधान कार्यालय, केंद्रीय सचिवालय, मंत्रालये व विभाग; मंडळे; आयोग, संलग्न कार्यालये, क्षेत्रीय संघटना. |
| ५ | **योजना आणि प्राधान्यक्रम**<br>नियोजन यंत्रणा, नियोजन आयोग आणि राष्ट्रीय विकास परिषद यांची भूमिका, रचना व कार्ये; सूचक नियोजन; केंद्र व राज्यस्तरावर योजना तयार करण्याची प्रक्रिया; संविधान सुधारणा (१९९२) आणि आर्थिक विकास व सामाजिक न्यायासाठी विकेंद्रित नियोजन. |
| ६ | **राज्य शासन आणि प्रशासन**<br>केंद्र-राज्य प्रशासकीय, वैधानिक व आर्थिक संबंध; वित्त आयोगाची भूमिका; राज्यपाल; मुख्यमंत्री; मंत्री परिषद; मुख्य सचिव, राज्य सचिवालय; संचालनालये. |
| ७ | **स्वातंत्र्यापासून जिल्हा प्रशासन**:<br>जिल्हाधिकाऱ्याची बदलत जाणारी भूमिका; केंद्र-राज्य-स्थानिक संबंध; विकास व्यवस्थापन व कायदा आणि सुव्यवस्था प्रशासनाची निकड; जिल्हा प्रशासन व लोकशाही विकेंद्रीकरण. |
| ८ | **नागरी सेवा**:<br>घटनात्मक स्थिती; रचना, सेवाभरती, प्रशिक्षण व क्षमता उभारणी; सुप्रशासन उपक्रम; आचारसंहिता व शिस्त; कर्मचारी संघ; राजकीय अधिकार; तक्रार निवारण यंत्रणा; नागरी सेवा तटस्थता; नागरी सेवा सक्रियता. |
| ९ | **वित्तीय व्यवस्थापन**<br>अर्थसंकल्प एक राजकीय साधन; सार्वजनिक खर्चावरील संसदीय नियंत्रण; मौद्रिक व राजकोषीय क्षेत्रात वित्तीय मंत्रालयाची भूमिका; लेखा तंत्रे; लेखापरीक्षण; लेखा नियंत्रक व भारताचे महानियंत्रक व महालेखा परीक्षक यांची भूमिका. |
| १० | **स्वातंत्र्यापासूनच्या प्रशासकीय सुधारणा**:<br>मुख्य विषय; महत्त्वाचा समित्या आणि आयोग; वित्तीय व्यवस्थापन व मानव संसाधन विकास यामधील सुधारणा; अंबलबजावणीतील समस्या. |
| ११ | **ग्रामीण विकास**: स्वातंत्र्यापासूनच्या संस्था व अभिकरणे; ग्रामविकास कार्यक्रम, लक्षकेंद्री आणि रणनिती; विकेंद्रीकरण व पंचायत राज; ७३ वी संविधान सुधारणा |
| १२ | **नागरी स्थानिक शासन**: नगरपालिका प्रशासन: मुख्य वैशिष्ट्ये, संरचना, वित्त व समस्या क्षेत्रे; ७४ वी संविधान सुधारणा; जागतिक-स्थानिक वादविवाद; नवा स्थानिकतावाद; नागरी व्यवस्थापनाच्या विशेष संदर्भातील विकासात्मक गतिशीलता, राजकारण व प्रशासन. |
| १३ | **कायदा व सुव्यवस्था प्रशासन**<br>ब्रिटिश वारसा; राष्ट्रीय पोलीस आयोग; तपास विषयक अभिकरणे; कायदा व सुव्यवस्था राखणे लष्करी बंड व दहशतवाद यांचे प्रतिरोधन करणे, यात निमलष्करी दलासह केंद्र व राज्य अभिकरणे यांची भूमिका; राजकारण आणि प्रशासनाचे गुन्हेगारीकरण; पोलीस- जनता संबंध; पोलीसांविषयक सुधारणा. |
| १४ | **भारतीय प्रशासनातील महत्त्वाचे मुद्दे**:<br>लोकसेवेतील मूल्ये; नियामक आयोग; राष्ट्रीय मानवाधिकार आयोग; संयुक्त आघाडी राजवटीतील प्रशासनाच्या समस्या; नागरिक- प्रशासन देवाण घेवाण; भ्रष्टाचार आणि प्रशासन; आपत्ती व्यवस्थापन. |



MPSCDaily.com

# (२४) समाजशास्त्र (माध्यम मराठी व इंग्रजी)

| पेपर-एक (विषय सांकेतांक - १०५५) | |
|---|---|
| **समाजशास्त्राची मूलभूत तत्वे** | |
| १ | **समाजशास्त्र-एक ज्ञान शाखा**<br>(अ) युरोपातील आधुनिकता आणि सामाजिक परिवर्तन व समाजशास्त्राचा उदय.<br>(ब) विषयाची व्याप्ती व इतर सामाजिक शास्त्रांशी तुलना.<br>(क) समाजशास्त्र आणि सामान्य व्यवहार ज्ञान. |
| २ | **समाजशास्त्र- एक विज्ञान:**<br>(अ) शास्त्र, शास्त्रीय पद्धत व मीमांसा.<br>(ब) संशोधन पद्धतीशास्त्रातील मुख्य सैद्धांतिक प्रवाह.<br>(क) प्रत्यक्षार्थवाद आणि त्याची मीमांसा.<br>(ड) तथ्ये, मूल्ये व वस्तुनिष्ठता.<br>(ई) प्रत्यक्षार्थवादा व्यतिरिक्तची पद्धतीशास्त्रे. |
| ३ | **संशोधन पद्धती आणि विश्लेषण:**<br>(अ) गुणात्मक व संख्यात्मक पद्धती.<br>(ब) तथ्य संकलनाची तंत्रे.<br>(क) चल, नमुनापद्धत, गृहीतकृत्य, विश्वसनीयता आणि वैधता. |
| ४ | **समाजशास्त्रीय विचारवंत:**<br>(अ) कार्ल मार्क्स- ऐतिहासिक भौतिकवाद, उत्पादनाच्या पद्धती, परात्मीकरण, वर्गसंघर्ष.<br>(ब) एमिल दुरखिम- श्रम विभाजन, सामाजिक तथ्य, आत्महत्या, धर्म व समाज.<br>(क) मॅक्स वेबर- सामाजिक क्रिया, आदर्श प्रकार, अधिकार, नोकरशाही, प्रोटेस्टंट नितीतत्वे आणि भांडवलशाहीचा आत्मा.<br>(ड) टॅल्कोल्ट पार्सन्स- सामाजिक व्यवस्था, प्रतिरुप चल घटक.<br>(इ) रॉबर्ट के.मर्टन- अप्रकट व प्रकट कार्ये, अनुचलन व विचलन, संदर्भ समूह.<br>(फ) मीड - स्व आणि अस्मिता. |
| ५ | **स्तरीकरण आणि गतिशीलता:**<br>(अ) संकल्पना- समानता, असमानता, श्रेणीरचना, वर्जितता, दारिद्य व वंचितता.<br>(ब) सामाजिक स्तरीकरणाचे सिद्धांत- संरचनात्मक-प्रकार्यवादी, मार्क्सवादी सिद्धांत, वेबरचा सिद्धांत<br>(क) आयाम-वर्गाची सामाजिक स्तरीभवन, दर्जात्मक समूह, लिंगभाव, वांशिकता आणि वंश (वांशिकता)<br>(ड) सामाजिक गतिशीलता-मुक्त आणि बंदिस्त प्रणाली, गतिशीलतेचे प्रकार, गतिशीलतेचे स्त्रोत व कारणे. |
| ६ | **कार्य आणि आर्थिक जीवन:**<br>(अ) विविध प्रकारच्या समाजातील कार्यांचे सामाजिक संघटन- गुलामगिरीचा समाज, सरंजामशाही समाज, औद्योगिक भांडवलशाही समाज.<br>(ब) कार्याचे औपचारिक व अनौपचारिक संघटन.<br>(क) श्रम आणि समाज. |
| ७ | **राजकारण व समाज**<br>(अ) सत्तेचे समाजशास्त्रीय सिद्धांत.<br>(ब) सत्ताधारी अभिजन, नोकरशाही, दबावगट व राजकीय पक्ष.<br>(क) राष्ट्र, राज्य, नागरिकत्व, लोकशाही, नागरी समाज, विचार प्रणाली.<br>(ड) निषेध, आंदोलन, सामाजिक चळवळी, सामूहिक कृती, क्रांती. |
| ८ | **धर्म व समाज**<br>(अ) धर्माचे समाजशास्त्रीय सिद्धांत.<br>(ब) धार्मिक प्रथांचे प्रकार: आत्मवाद, एकतत्ववाद, बहुतत्ववाद, संप्रदाय,पंथ, उपासना पद्धती.<br>(क) आधुनिक समाजातील धर्म: धर्म आणि विज्ञान, धर्मनिरपेक्षता, धार्मिक पुनरुज्जीवनवाद, मूलतत्त्ववाद. |
| ९ | **नातेसंबंधाच्या पद्धती**<br>(अ) कुटुंब, घरदार, विवाह |



MPSCDaily.com

| | |
|---|---|
| | (ब) कुटुंबाचे प्रकार आणि स्वरूप.<br>(क) वंशावळ व वंशपरंपरा.<br>(ड) पितृसत्ताक पद्धती आणि लिंगाधारित श्रमविभागणी.<br>(इ) समकालीन कल. |
| १० | <u>**आधुनिक समाजातील सामाजिक बदल**</u>:<br>(अ) सामाजिक परिवर्तनाचे समाजशास्त्रीय सिद्धांत.<br>(ब) विकास आणि परावलंबन.<br>(क) सामाजिक परिवर्तनाचे कर्ते.<br>(ड) शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन.<br>(इ) विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक परिवर्तन. |

| | |
|---|---|
| **पेपर-दोन (विषय सांकेतांक-१०५६)** | |
| | <u>**भारतीय समाज: संरचना आणि परिवर्तन**</u> |
| अ. | **भारतीय समाजाची ओळख:**<br>(१) **भारतीय समाजाच्या अध्ययनाचे परिप्रेक्ष्य.**<br>(अ) प्राच्यविद्याशास्त्र (जी.एस.घुर्ये)<br>(ब) संरचनात्मक प्रकार्यवाद (एम.एन. श्रीनिवास)<br>(क) मार्क्सवादी समाजशास्त्र (ए.आर. देसाई)<br>(२) **वसाहतवादी राजवटीचा भारतीय समाजावरील परिणाम :**<br>(अ) भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी<br>(ब) भारतीय परंपरेचे आधुनिकीकरण<br>(क) वसाहतवादी कालखंडादरम्यानचा विद्रोह व चळवळी<br>(ड) सामाजिक सुधारणा |
| ब. | <u>**सामाजिक संरचना**</u><br>(१) **ग्रामीण व कृषक सामाजिक संरचना:**<br>(अ) भारतीय खेड्यांची कल्पना व खेड्यांचा अभ्यास<br>(ब) कृषक समाज संरचना- भू-धारणा पद्धतीची उत्क्रांति, जमिन सुधारणा.<br>(२) **जाती व्यवस्था**<br>(क) जाती व्यवस्था अभ्यासाचे परिप्रेक्ष्य: जी.एस.घुर्ये, एम.एन.श्रीनिवास, लुई ड्युमाँ, आन्द्रे बेत्ती.<br>(ब) जाती व्यवस्थेची वैशिष्ट्ये.<br>(क) अस्पृश्यता- स्वरूप व परिप्रेक्ष्य.<br>(३) **भारतातील आदिवासी समुदाय**<br>(अ) परिभाषीय समस्या<br>(ब) भौगोलिक विस्तार<br>(क) वसाहतवादी धोरणे व जमाती<br>(ड) एकात्मतेचे आणि स्वायत्ततेचे प्रश्न<br>(४) **भारतातील सामाजिक वर्ग**<br>(अ) कृषक वर्गीय संरचना<br>(ब) औद्योगिक वर्ग संरचना<br>(क) भारतातील मध्यमवर्ग<br>(५) **भारतातील नातेसंबंधी पध्दती**<br>(अ) भारतीय वंशावळ व वंशपरंपरा<br>(ब) नातेसंबंधाचे प्रकार<br>(क) भारतीय कुटुंब व विवाह पद्धती<br>(ड) कुटुंबाचा घरदारविषयक पैलू<br>(इ) पितृसत्ताक पद्धती, हक्क व लिंगाधारित श्रमविभागणी |


MPSCDaily.com

| | |
|---|---|
| | (६) **धर्म व समाज**<br>(अ) भारतातील धार्मिक समुदाय<br>(ब) धार्मिक अल्पसंख्याक समुदायांच्या समस्या |
| **क.** | **भारतातील सामाजिक परिवर्तन:**<br>(१) **भारतातील सामाजिक परिवर्तनाची दृष्टी:**<br>(अ) विकासासाठीच्या नियोजनाची कल्पना व मिश्र अर्थव्यवस्था<br>(ब) संविधान, कायदा व समाज परिवर्तन<br>(क) शिक्षण आणि समाजपरिवर्तन<br>(२) **भारतातील ग्रामीण व कृषक स्थित्यंतर:**<br>(अ) ग्रामविकास कार्यक्रम, समुदाय विकास कार्यक्रम, सहकारी संस्था, दारिद्रय निर्मूलन योजना.<br>(ब) हरितक्रांती आणि सामाजिक परिवर्तन<br>(क) भारतीय कृषीक्षेत्रातील उत्पादनाच्या बदलत्या पद्धती<br>(ड) ग्रामीण श्रमिकवर्ग, गुलामी, स्थलांतर.<br>(३) **भारतातील औद्योगीकीकरण व नागरीकरण**<br>(अ) भारतातील आधुनिक उद्योगाची उत्क्रांती<br>(ब) भारतात नागरी वसाहतींची वाढ<br>(क) कामगार वर्ग: संरचना, वाढ, वर्गीय गतिशीलता<br>(ड) अनौपचारिक क्षेत्र, बाल कामगार<br>(इ) शहरी क्षेत्रातील झोपडपट्टया व त्यांची वंचितता.<br>(४) **राजकारण व समाज:**<br>(अ) राष्ट्र, लोकशाही आणि नागरिकत्व<br>(ब) राजकीय पक्ष, दबाव गट, सामाजिक व राजकीय अभिजन<br>(क) प्रादेशिकतावाद व सत्तेचे विकेंद्रीकरण<br>(ड) निधर्मीकरण<br>(५) **आधुनिक भारतातील सामाजिक चळवळी:**<br>(अ) कृषक चळवळी व शेतकरी आंदोलन<br>(ब) स्त्रियांच्या चळवळी<br>(क) मागासवर्ग व दलित चळवळी<br>(ड) पर्यावरणीय चळवळी<br>(इ) वांशिकता व अस्मितेवर आधारलेल्या चळवळी<br>(६) **लोकसंख्या गतितत्व:**<br>(अ) लोकसंख्या आकारमान, वाढ, रचना व वितरण<br>(ब) लोकसंख्या वाढीचे घटक: जन्म, मृत्यू, स्थलांतर<br>(क) लोकसंख्या धोरण व कुटुंब नियोजन<br>(ड) अलिकडे उद्भवलेले प्रश्न: वृद्धत्व, लिंगदर, बालमृत्यूदर व शिशूमृत्यूदर, प्रजोत्पादक आरोग्य.<br>(७) **सामाजिक स्थित्यंतराच्या समस्या :**<br>(अ) विकासाचे अरिष्ट: विस्थापन, पर्यावरणीय प्रश्न व शाश्वतता.<br>(ब) दारिद्र्य, वंचितावस्था व विषमता<br>(क) महिलांवर हिंसाचार<br>(ड) जातीय संघर्ष<br>(इ) वांशिक संघर्ष, धर्माधारित संघर्ष, धार्मिक पुनरुज्जीवनवाद<br>(फ) निरक्षरता व विषमता |

**टिप: उपरोक्त सर्व विषयांचा इंग्रजी भाषेतील अभ्यासक्रम अंतिम व अधिकृत समजण्यात येईल.**



MPSCDaily.com